
संजय बनसोडे
यटाळ

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संजय लिंबाजी बनसोडे

लिखित

अनुभव

# यटाळ

# यटाळ

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

यटाळ (अनुभव)

संजय लिंबाजी बनसोडे
कवी लेखक पत्रकार
रा. चोंढी ( खु ), ता. सेनगाव, जि. हिंगोली

हल्ली मुक्काम :
1195/ 002 नकुल गायकर बिल्डिंग
पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ
घणसोली गाव, नवी मुम्बई 400701

मोबाईल नंबर : 9819444028
email id: sbansode40@gmail.com
blog id : sanjaylbansode.blogspot.in
facebook id : facebook.com/sanjay.bansode.31542

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ११ जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.



"जग बदल घालूनी घाव
सांगून गेले मला भीमराव"...

# संजय लिंबाजी बनसोडे



1) "सम्यक वर्तमानकाळ" या मासिक वृत्तपत्राचे नवी मुम्बई प्रतिनिधी.

2) "देऊ वादळाशी लढे" हा आंबेडकरी कवितासंग्रह प्रकाशित.

3) गीतकार म्हणुन दहा गाणे आणि कथेतून साकारलेल्या दोन शॉर्टफिल्म.

4) देशोन्नती वृत्तपत्रात 100 पेक्षा अधिक कविता प्रकाशित. दैनिक सम्राटमधे अनेक लेख प्रकाशित.

5) अनेक कवी सम्मेलनमधे सहभाग.

त्रिरत्न सामाजिक

संस्था (कल्याण ) या संस्थेमार्फत " भीम लेखणी विचारमंच" या माझ्या साहित्यिक ग्रुपला "समाजरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले..

कुष्ठरोगी दिन-दलित सेवा संघ, बौद्ध एकत्रीकरण आणि मातृभूमी सेवाभावी संस्थेच्या वतीने कार्याची दखल घेऊन सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# यटाळ

( लेखक - संजय लिंबाजी बनसोडे )

माझे आजोबा,

लक्ष्मण बकाजी बनसोडे

व

दशरथ हनवते (बोन्डाळा)

यांच्या चरणी.

मनोगत

ई - साहित्य मार्फत प्रकशित होणाऱ्या  'यटाळ' या माझ्या तिसऱ्या कादंबरी विषयी काही तुम्हास सांगावस वाटतंय.

'यटाळ' म्हणजे भाऊबंदाचेच शेजारी शेजारी असलेले घरे. तीस पंचवीस वर्षांपूर्वी माझही एक यटाळ होतं जे एकमेकाच्या सुख दुखात  धावून यायचं. आज हे यटाळ पोटापाण्यासाठी बिखरलं असलं तरी त्या आठवणी आजही काळजात जिवंत आहेत. आणि त्यातूनच निर्माण झालं 'यटाळ'.

'यटाळ' या माझ्या कादंबरीत माझ्या लहानपणी घडलेले काही किस्से मी शब्दबद्ध केले आहेत. माझ्या यटाळीतील लोकांची देवांविषयी अंधश्रद्धा, आणि हळूहळू त्यांच्यात झालेले परिवर्तन.  भावकीविषयी प्रेम, विश्वास,  अगदी जसा होता तसाच मांडण्याचा प्रयत्न मी या कादंबरीत केलाय.

माझा यटाळ आणि गावकुसावर वसलेला बौद्धवाडा,  तीस पंचवीस वर्षांपूर्वी जसा होता अगदी तसाच,  या कादंबरी मार्फत  तुमच्यापर्यंत पोचवण्याचा मी प्रयत्न केलाय.

ही कादंबरी वाचून नकळत, कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मनापासून माफी मागतो.


माझी ही तिसरी कादंबरी "ई- साहित्य" प्रकाशित करीत आहे, त्याबद्दल ई-साहित्यांच्या सर्व टीमचे मनःपूर्वक आभार.


माझे जेष्ट बंधू मारोती बनसोडे, माझे मामा डॉ. हीरामन हनवते, मित्र महेंद्र इंगळे, प्रमोद पवार, प्रेम काळे, पांडुरंग बनसोडे यांचेही मनःपूर्वक आभार.

संजय लिंबाजी बनसोडे

9819444028


Sbansode40@gmail. com




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pinjaraa_sanjay_bansode.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dushkali_vavtal_sanjay_bansode.pdf


संजय बनसोडे
यटाळ

# 1

जून महीना उजाडला होता. वातवरण ढगाळ झालं होतं. एप्रिल मे महिन्यात हाहाकार माजवलेल्या सूर्याचे तप्तरूप जमिनीत खोलवर जावून जमीन भेगाडली होती. त्यामुळे सूर्य जरी ढगाआड असला तरी, गर्मीमूळे अंगातून घामाचा पाट वाहत होता.

माझे माय बाप मात्र पत्र फ्यारण्यामधे व्यस्त होते. माझा बाप घरावर चढून, पतरावरची मोठ मोठी दगड बाजूला सारून घरावरचे एक एक पतर मायच्या मदतीने खाली उतरवीत होता. खाली आणलेले पतर माय फड्याने स्वच्छ झाडत होती व फुटक्या ठिकाणी त्याची डागडुज करत होती. पतर साफ झाल्यावर पुन्हा ते पतर वर चढवून त्यावर माझा बाप दगड ठेवीत होता. मी मात्र पत्रावरच्या मातीत काही खेळण्याचे सापडते का, ते शोधीत होतो. मला खाली खेळताना बघून वरून माझा बाप मला आवाज देत होता,

"बापू, बाजूला व्हय! एखादा दगड बिगड पडल अंगावर तुह्या! "

बापाचे संपल्यावर मायने ही आवाज चढवला, "व्हय रं डेंगरा बाजूला! मधी मधी करते माय कामाच्या! "

माझा बाप मला लहानपणी बापूच बोलीत होता. तो अजूनही मला बापूच बोलतो. त्याचे कारण ही तसेच होते. मी होण्या अगोदर माझ्या माय बापाला चार मुली अन् एकच मुलगा  झाला. माझा बाप माझ्या आजोबांच्या खूप लाडका होता आणि एकुलता एक ही, त्यामुळे माझ्या आजोबांचा माझ्या बापावर फार जीव. पण माझ्या बापाला, बापाचे प्रेम जास्त दिवस वाट्याला आले नाही. माझा बाप सोळा सतरा वर्षाचा असतांनाच माझ्या आजोबांची प्राणज्योत मालवली.

पण जाता जाता आजोबांनी माझ्या वडिलांकडून एक वचन मागितले, "जसा तु एकुलता एक हायीस, तसा तुझा वंश नको ठेवू, चांगले चार पाच होऊंदे. साऱ्या भावकित  त्यांचा दरारा असला पाहिजे. "

तसा माझ्या बापानेही प्रयत्न केला. पण वाट्याला जास्त मुलीच आल्या. माझ्या मायच्या प्रत्येक गरोदरपणात माझा बाप एका देवाला नवस बोलायचा. मुलगी झाली तर स्वतःला  दोष द्यायचा, मुलगा झाला तर देवाचा आशीर्वाद समजायचा. ज्या दोन देवाने माझ्या वडिलांचे नवस पूर्ण केले, एक  माझा भाऊ होतांना आणि दुसरा मी होतांना त्या देवाची सर्वात जास्त कृपादृष्टी आपल्यावर आहे म्हणून अजूनही त्या देवांचे उपास तापास सोडले नाही.

माझा जन्म झाल्यावर माझ्या घरात भावंडांची अर्धा डजन संख्या झाली. मी सर्वात लहान होतो व एका भविष्यवाल्यांनी माझ्या बापाला पैशांने गंडवून भविष्यवाणी केली होती की, हा (मी) साक्षात तुमच्या वडीलांचा अवतार आहे. तुम्हांला ते जीवनाच्या अर्ध्यारस्त्यावर सोडून गेले म्हणून त्यांनी पुन्हा तुमच्या कुळात

जन्म घेतला. त्यामुळे मी माझ्या बापाचा फार लाडका होतो. शेतात, जत्रेला, परगावी कुठेही मला ते आपल्या खांद्यावर घेऊन जात. माझ्या बापाला जवानपणी कुश्त्याचा फार नांद होता. जेंव्हा जत्रेत कुश्त्या चालू होत होत्या तेंव्हा ते मला एकट्यालाच घेऊन जात असत.

पावसाळा जवळ येत होता म्हणून साऱ्या गावातच पत्रे फ्यारनी व डाळणी चालू होती. माझ्या बापानेही पत्रे फ्यारनी झाल्यावर लगेच पळसाच्या पानाने घरावर डाळण केले. जेणेकरून पत्रांच्या व भिंतीच्या मधून पावसाचे पाणी आत येऊ नये. जेंव्हापासून वातावरणात बदल झाला तेंव्हापासून मला विचित्र त्रास होत होता. माझ्या साऱ्या अंगाने खाज सुटत होती. हा त्रास मी लगेच माझ्या माय बापाला कळवला.

माझ्या माय बापाने जेंव्हा माझ्या अंगावर निरखून बघितले तर त्यांना "सुवा" (पिसू -ज्या प्राण्यांच्या अंगावर असतात )आढळून आल्या. ह्या सुवा दुसऱ्या तिसऱ्या काही नसून हा आपल्या गावातील मारुतीचाच प्रकोप आहे असे माझ्या मायने निश्चित केले. त्या सुवा बघून माझी माय त्या मारुती देवाला म्हणत होती,

"देवा!

हे मारुती राया!

का सतवतो रे मह्या लेकराला? "

मी तेंव्हा आठ नऊ वर्षाचा होतो. हे सारे माझ्यासाठी नवीन होते. हे सारे माझ्या कोवळया मेंदूत खोलवर घर करत होते. मायचे असे बोल ऐकून मी लगेच मायला बोललो,

"माँ... ह्या मारुतीच्या सुवा ह्यायतं? "

"होय बाबा "

“मंग ह्या मह्या अंगावून कधी जाणार? लय तरास द्यायल्यात मल! खाजवून खाजवून अंगाची आग होतय मह्या, त्यो कव्हा त्याच्या सुवा वापस घेणार? "

असे बोलल्यावर माझ्या मायने माझ्या अंगावरची एक सु घट्ट हातात पकडली. तिला एका कागदावर ठेऊन पुडीबंद करून माझ्या हातात दिली आणि मला म्हणाली,

"जा.........! एखाद्या सोबत्याला घेऊन, आणि पारावरच्या मारुती जवळ ही सु सोडून ये! म्हणजे तुह्या अंगावरच्या साऱ्या सुवा गायब व्हतील. "

मी ती कागदाची पुडी हातात घेतली व माझ्या मायने फार मोठी मोहीम माझ्यावर सोपवली असे समजून तडक यटाळातल्या बंड्याच्या घरात गेलो, अन् बंड्याला हाक मारली,

"ये बंड्या! हायेस का घरात? "

माझा आवाज ऐकताच मायच्या मांडीवर झोपलेला बंड्या ताडकन उठून बाहेर आला आणि बोलला,

"काय रे संज्या? काय...? "

"अरे, इकडे ये! तुला एक गोष्ट सांगायची. "

तसा बंड्या लगबगीने खाली आला अन् मला म्हणाला, "काय, बोल? "

बंड्या माझ्या जवळ आल्यावर मी सारी हकीकत बयान केली. बंड्या माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा असल्यामुळे भोंगळ्या पायाने सारे गाव पालथे घालीत होता. गावातली एकएक गल्ली बोळी त्याला माहीत होती. मी मात्र बुद्धवाड्याच्या बाहेर अजून पडलोच नव्हतो. शाळाही बुद्धवाड्या जवळच असल्यामुळे मराठवाड्यात (गावात)जाण्याचा प्रश्नच येत नव्हता.

बंड्यान माझं सारं गऱ्हाण ऐकून घेतल्यावर पुढे म्हणाला, "अरे, पारावरच्या मारुतीवर आपल्याला जाता येत नाही. तिथं आपल्याला एखाद्या मराठ्याच्या पोरानं पाह्येलं तर आपल्याला ती मारतील! "

"म्हंजी "

बंड्याचे बोलणे मला थोडे वेगळेच वाटले.

"अरे संज्या, आपण बुद्धाचे पोरं त्या मारुतीला चालत नाही. आपण एक काम करू, संध्याकाळ झाल्यावर आपण त्या पोरांच्या मुकाट्यान मारुतीच्या मंदिराच्या मागं ही सु सोडून येऊ. "

बंड्याचे बोलणे ऐकून घेऊन आमच्या दोघांचे मारुतीच्या मंदिरात जाण्याचे नक्की झाले. पण संध्याकाळ होईपर्यंत माझ्या कोवळया मेंदूवर प्रश्नाचा मारा होत होता. आता मला फक्त त्या मारुतीची उत्सुकता लागली होती. ज्याला आम्ही चालत नाही त्यांनी त्याच्या सुवा माझ्या अंगावर का सोडल्या?

सूर्य ववभर डूबायचा बाकी होता तोच बंड्या माझ्या दारात उभा! त्याला बघताच मीही खाली आलो. सुवाची पुडी मी घट्ट हातातच पकडली होती. एकटं गावात जाण्याची ही माझी पहीलीच वेळ. एखाद्या वेळी बोटाला धरून पाटलाच्या घरी रई लागल्यावर ताक घेण्यासाठी माय मला घेऊन जाई. पण आज मी माझ्या स्वतःच्या पायावर गावात जात होतो, मायने दिलेले काम फत्ते करण्यासाठी. एका हातात बंड्याचा हात पकडून व एका हातात कागदबंद सु घट्ट पकडून कावऱ्या बावऱ्या नजरने पुढे पुढे जात होतो. पारावरच्या मारुतीचं मंदिर शेवटच्या टोकाला आणि आमचं यटाळ एका टोकाला असल्यामुळे सारे गाव आम्हांला पालथे घालायचे होते. गावातल्या पाटलाचे घर संपल्यावर पुढचे घरे माझ्या अनोळखीचे होते. बौद्धवाड्यातील आमच्या यटाळातले घरे दगड पत्राची व त्यावर सेणाचे लिंपण, पण गावातली. माळवदाची घरे बघून मी चकित झालो. प्रत्येक घर हे एकाचढ एक होते. आत सागवाण लाकडाचे माळवद आणि बाहेर भलेमोठ जोतं.

त्यावर गावातली सारी मंडळी संध्याकाळच्या वेळी आपआपल्या जोत्यावर बसून आराम करीत होती. काही बायका सुपात गहू तांदूळ घेऊन पाखडत होत्या. पाखडता पाखडता आमच्याकडे बघून एकमेकीस विचारीत होत्या,

"कोणाची गं पोरं ही? "

शेजारच्या बाईला माहीत असेल तर ती चटकन तिला सांगित होती, "त्यों पलिकडचा ज्ञानबा बुद्धाचा अन् ह्यो लिंबा बुद्धाचा. "

ज्यांना माहीत नव्हते ती सरळ आम्हांला विचारीत होती. "कोणाची रं पोरहो तुम्ही? "

तेंव्हा आम्ही दबक्या आवाजात कावरे बावरे होऊन उत्तर देत होतो,

"मी, ज्ञानबा बुद्धाचा "

"आन् मी.... मी लिंबाजी बुद्धाचा "

हे ऐकून पाटलीन बाई चढ्या आवाजात आम्हाला खडसावत होती.

“ऐधोका इकडं काय चोरी करायलं आले का रे? "

हे ऐकून आम्ही तेथून चुपचाप काढता पाय घेऊन पुढे पुढे जात होतो. थोड्या वेळाने मी ज्या मारुती रायाची वाट बघित होतो तो क्षण आला.

एक मोठा ओटा त्याच्या शेजारी भलं मोठं एक वडाचं झाड़, त्याच्या खोडाला दोऱ्याचा वेढा आणि ओट्याच्या मधोमध मारुतीचे मंदिर त्या मंदिराच्या

छोटोशा दरवाज्यातून आत एक मोठा दगड व त्यावर अबडधोबड मूर्तिचे कोरीव काम आणि त्या पूर्ण दगडाला शेंदूरफासलेला. मला बंड्याने सांगितले,

"ह्योच त्यों मारुती. "

मारुती दिसताच बंड्याने हात जोडले त्याचे बघून मीही जोडले. मंदिरा  बाहेर जोत्यावर पाच सहा जन गप्पा मारीत बसले होते. बसता बसता कुणी दोरी वळत होते तर कुणी नुसत्याच गप्पा गोष्टी करीत होते. त्यांच्या नजरा चुकवून आम्ही चुपचाप त्या मंदिरा मागे गेलो आणि हातात असलेली ती सु सोडून तेथून काढता पाय घेतला. तेथून घरी येता येता चांगलाच अंधार झाला होता. माझे मायबाप ही काम करून थकले होते. सर्वांना कडाडून भूका लागल्या होत्या म्हणून आम्हां भावंडांचे लक्ष आता चुलीकडे लागले होते. माझ्या मायने एका चुलीवर मातीच्या मडक्यात डाळ शिजवायाला ठेवली होती अन् एका चुलीवर ती भाकरी थापत होती.  तव्यावर टाकलेली आंबटओली भाकर ती चुलीतल्या विस्तवावर भाजून गरम करीत होती अन् माझी मोठी बहीण आम्हांभावंडांना डाळ अन् भाकर वाढत होती. सर्वांचे जेवण झाल्यावर मी रात्रीचा निवांत माझ्या आईच्या कुशीत झोपलो. आज माझे मन ऐका वेगळयाच गोष्टीमुळे प्रसन्न झाले होते. म्हणून आईची राक्षस, देवाच्या गोष्टी न ऐकताच शेंदूर फासलेल्या मारुतीलाच आठवून झोपी गेलो.

# 2

सकाळचे चार वाजले न वाजले तशी माझी माय घाई गड़बड़ीत झोपेतून उठली. दरवाजाची कुंडी खोलून एक नजर शेजारच्या घराकडे मारली. सर्व यटाळ शांत अन् साखर झोपेत होतं. माझ्या मायला मात्र आता झोप लागत नव्हती. आज टेंभरीचे पानं तोडण्यासाठी कोणत्या शिवारात जावं हाच विचार  रातभर तिच्या मनाला शिवत होता. तिने आज ठरवले होते. आज शेजारनीच्या नजरा चुकवून एकटीनेच जायचे. जर टोळीने गेले तर पाहिजेत तेव्हढे पाने हाती लागत नाहीत. त्यामुळे आज आपण एकटीनेच कुणाला न सांगता जावे हा तिने विचार केला. यटाळीतील साऱ्याकडे थोड्या थोड्या कोरडवाहू जमिनी होत्या. त्या जमिनीवर त्यांना धड पोट ही भरता येत नव्हते आणि धड उपाशीही रहाता येत नव्हते. गाव सोडून कुठे कामधंध्यासाठी गेले तर जमिनी पडीक राहतील व कुणी त्यावर कब्जा करील या भीतीने यटाळीतील सारेजन शेतीबरोबर जो जोड़धंदा मिळेल तो करीत होते. उन्हाळा लागल्यावर अशाच एक जोड़धंदा म्हणजे टेंभरीच्या पानांचा, ब्राह्मणवाड्याच्या बंजारा समाजातील एका ठेकेदाराने शहरातल्या बीड़ीच्या कारखान्यातून टेभरीचे पाने सप्लाय करण्याचा ठेका मिळवला होता. त्याच टेंभरीच्या पानाची कारखानदार बीड़ी बनवत असे. ब्राह्मणवाड्याच्या शेजारीच माझे गाव होते

त्यामुळे त्या व्यापाऱ्यापर्यंत पाने विकणे आम्हा सोपे होते. त्यामुळे आमच्या यटाळीतील बायका उन्हाची पर्वा न करता  शिवार ना शिवार पालथा घालून पाने तोडून त्याच्या जुड्या बनवून विकत असत.

टेंभरीचे पाने तोडण्यासाठी आज माझी मायही लवकर उठली होती एरवी सा़ऱ्या बायकासोबत जाणारी माझी माय आज एकटीच जाणार होती. बायका सोबत गेल्यावर हवे तितके पाने मिळत नाही त्यामुळे माझ्या मायने आज तिचे वेगळेच बिराड केले होते. बाकी बायकांच्या लवकर उठून झाकत पडायच्या आतच रानात जाण्याचा बेत होता माझ्या मायचा. त्यामुळे ती लवकर उठली चुल पेटवून स्वयंपाकाला लागली. ज्वारीची भाकर थापून तव्यावर टाकत होती. अर्धी कच्ची भाजल्यावर तीला चुलीतील आहारात आडवी लावून शेकत होती. चुलीतल्या धुराने व आवाजाने मला जाग आली. मी बाजेवरून उठून मायला बोललो,

"माँ एवढ्या लवकर का भाकरी करते? आपल्यालं मामाच्या गावी जायचं का? "

"गप्प बस्स मूडद्या! शेजारच्या बायका ऐकतील तर झोपतून उठतील. त्या उठायच्या अगोदर रानात जायचे आज पाने तोडायला. "

"माँ मी पण येतो तुह्या सोबत "

"हो चाल मव्ह डोस्क खायालं "

असे बोलून घाईगड़बडीत मायने भाकरी बनवल्या. दहा बारा भाकरी झाल्यावर त्या दूरडीत ठेवल्या. झेल्यातून दहा बारा वाळलेल्या लाल मिरच्या अन् पाच सहा लसणाच्या काचूळया घेतल्या. गरम तव्यावर तेलाचा एक दोन थेंब टाकून त्या मिरच्या आबडधोबड भाजल्या. नंतर त्या खलबत्त्यात टाकल्या त्यात लसूण अन् मीठ टाकून त्याला रुचण्याने ठेचुन ठेचुन त्याची चटणी बनवली. ती खलबत्त्यातून काढून थोडी दूरडीत टाकली. नंतर दूरडीतल्या दोन भाकरी अन् ती चटणी एका कपड्यात गुंडाळली आणि माझ्या बापा जवळ जावून हळूच म्हणाली,

"ओsssssssss मी जाते म्हणलं संज्याला घेऊन "

माझा बाप झोपेतूनच म्हणाला,

"हं जाय! कोणत्या शिवारात चालली? "

"दगडीत "

"बर्... "

"चाल रे पोरा लवकर "

असे बोलून माझी माय मला घेऊन घरच्या बाहेर पडली. नुकतीच झाकत झाली होती. कोंबडे बागावर बाग देत होते. गोठ्यातल्या गायीं आपल्या वासराना पाजायला हंबरत होत्या. झाडावर कावळयांचे काँवकाँव चालू होती. मी मात्र मायचे बोट धरून तिच्या सोबत चाललो होतो. आमच्या बौद्ध वाड्यातले अन् मांगवाड्यातले सर्वजन साखर झोपेत होते पण मराठवाड्यात सर्व बायका जागी झाल्या होत्या. कुणी

गायीं म्हशीचे दूध काढित होत्या कुणी अंगणात सडा टाकीत होत्या. कुणी भांडी घासत होत्या. आम्हीं मात्र तडक गावातून निघून रानात जायचा रस्ता पकडला. रस्त्याने थोडं पुढं गेलं की बाप्याची हागणदारी लागली. रस्त्याच्या बाजूला कुणी बीड़ी ओढत कुणी खोक खोक करीत बसला होता आपापले तांबे पुढं ठेऊन. तेथून जातांना मायने नाकाला पदर लावून मला ओढितच पुढे पुढे नेले. हागणदारी व गायरान आम्हीं कधीच मागे टाकले होते. आम्हांला काळीभोर नांगरलेली वावरं दिसत होती. आता जमिनीवर असलेली अंधाराची झापड जाऊन चांगलेच उजाडले होते. पूर्वेकडे तांबटही दिसत होता. आता मात्र माझ्या मायने चालण्याची गती वाढवली. कदाचित अंधारात तीला भीती वाटत असेल. आम्ही आता दगडीच्या शिवरात पोचलो होतो. माय आता रस्ता सोडून रानात घुसली. काखेत अडकवलेलं चव्हाळं आता तिने सोडून हातात घेतले. माय आता टेंभरीच्या झाडाचा शोध घेत होती. एका शेतात मायला छोटसं टेंभरीचं झुडूप दिसलं तशी तीने त्या छोट्याशा झुडपावर झडप घातली. खाली चव्हाळं अंथरुन त्या झुडपाचे पान ना पान तोडायला सुरवात केली. माय पाने तोडून चव्हाळयात टाकत होती. मी मात्र जवळच्या झुडपात व्हलगीचे अंडे सापडतात का याचा शोध घेत होतो. मला बघून मायने आरोळी ठोकली,

"आरं तिकडं काय करतस? बाया आल्या की आपल्याला जास्त पानं भेटणार नाही. इकडं ये, पानं तोडू लाग मलं. "

"हो माये येतो! "

असे बोलत मी धावतच माय जवळ गेलो अन् पाने तोडायला लागलो. थोड्या वेळातच कोंबडी लुचावी तसे आम्हीं माय लेकाने त्या झुडपाला लूचले. आता ते झुडुप  पानगळ झालेल्या झाडासारखे दिसत होते. खाली मात्र हिरव्यागार पानांचा ढीगच आम्हीं टाकला होता. तोडलेले सारे पाने चव्हाळयात भरून ते डोक्यावर घेतलं अन् आम्हीं दुसऱ्या झाडाच्या शोधात पुढे निघालो.

नुकताच सूर्याचा लालबुंद गोळा जमिनीच्या पोटातून वर येत होता. जणू काही सूर्याचा जन्मच होत आहे व जमीन प्रसूत होत आहे आणि त्याचा आनंदोत्सव रानातील रंगीबेरंगी पक्षी करीत आहेत. वावर पालथ घालित आम्हीं माय लेक पुढेपुढे जात होतो. चालता चालता माझी माय अचानक थांबली. तीला थांबलेलं बघून मी म्हणालो,

"काय झालं माये? काहून थांबली? "

"संज्या ते बघ! टेंभरीचे केवढे मोठे झाड. "

"बाप्पौ.... माये, आता तं आपली लॉटरीच हाये "

आम्हीं दोघेही त्या झाडाच्या दिशेने पळत सुटलो. मायने चव्हाळ  खाली अंथरलं आणि मला म्हणाली, "हे पाह्य संज्या मी या झाडावर चढ़ते. पानं तोडून खाली टाकते. तु ते चव्हाळयात भर. "

मी मान हलवली तशी माय माणसावानी त्या झाडावर चढली. माय डहाळया तोडून खाली टाकत होती मी त्याचे पाने तोडून चव्हाळयात भरत होतो.

थोड्या वेळात आमचं चव्हाळ पानांनी भरून गेलं ते पाहून मी वर असलेल्या माझ्या मायलं आवाज दिला, "ये माँ.... बस्स कर! चव्हाळ भरलं, आता ठेवायला जागा नाय!"

"बर् बर्, थांब उतरते मी खाली. "

असे बोलून माय झरझर त्या झाडावरून खाली उतरली. माय आता थकली होती ते तिच्या घामाघूम झालेल्या चेहऱ्यावरून समजत होते. मायने त्या पानाचे दोन गाठोडे केले एक छोटं मह्या डोक्यावर दिलं अन् मोठं तिनं तिच्या डोक्यावर घेतलं.

"माये, मलं लय भुक लागली आन् तहान बि लागली "

"बर् बर् चाल थोडा पुढं इहीर दिसली की भाकरी खाऊ "

सूर्य हळूहळू डोक्यावर येत होता तशा त्या रानात उन्हाच्या लाव्हा आमच्या अंगाला जाळत होत्या. सगळीकडे भयाण शांतता होती अधून मधून कोकीळ आपल्या सुरेल आवाजात त्या ओसाड रानाला मंत्रमुग्ध करी. डोक्यावर मोठमोठी पानांचे गाठोडी घेऊन आम्हीं त्या रानात ढेकळे तुडवित जात होतो पुढेपुढे. त्या रनरनत्या उन्हामुळे आमच्या दोघांच्याही घशाला कोरड पडली होती. शेवटी माय लेकाला एक विहीर गावलीच.

घाईघाईत आम्हीं त्या विहीरीजवळ गेलो एका हिरव्यागार लिंबाच्या झाडाखाली मायने गाठोडं टेकवलं माझं डोक्यावरचे गाठोडं उचलून खाली ठेवलं.

पोहऱ्याने पाणी काढले सकाळपासून तहानेने तरसत असलेल्या आम्हीं दोघांनीही घटाघटा पाणी प्याले. सोबत आणलेली भाकर सोडली दोघांनीही खाल्ली. थोडा वेळ विश्रांती घेऊन पुन्हा गावच्या  दिशेने निघालो.

डोक्यावर ओझं असल्यामुळे माय झपाट्याने अंतर कापत होती मीही छोटसं गाठोडं घेऊन तिच्या मागे पळत होतो. चांगले एक दीड तास चाललो तरी गावचा रस्ता लागत नव्हता. त्यामुळे माय आणखीच घाबरली. कारण अर्ध्या तासाच्या आत तो रस्ता लागायला हवा होता तरीही त्या रस्त्याचा अजून थांगपत्ता लागत नव्हता. आजूबाजूचा शिवार मायला अनोळखी वाटत होता. आपण रस्ता चुकलो हे मायच्या लक्षात यायला वेळ नाही लागला. थरथरत्या हाताने घाम पुसत माय मला म्हणाली,

"संज्या, ह्यो आपला शिवार नाही. आपल्याला चकव्यान भटकवलं. आपण दुसऱ्याच गावच्या शिवारात चाललो. "

चकवा नाव ऐकून आता मलाही घाम फूटायला लागला. चकव्याच्या अनेक गोष्टी आणि अनुभव भावकितल्या लोकांचे  मी ऐकून होतो. अगोदर चकवा माणसाला दिशाहीन करून भलतीकडेच नेतो त्यानंतर चकवा जी दिशा दाखवील त्याच दिशेने तो माणूस चालायला लागतो शेवटी एकाद्या विहीरीत ढकलून त्याचा जीव घेतो. मायने आपल्या डोक्यावरचे गाठोडे एका मोठ्या झाडाखाली टेकवले माझंही गाठोडं खाली ठेवले अन् मला म्हणाली,

"हे पाह्य संज्या मी या झाडावर जावून एखादा रस्तादिसते का ते पाह्येतो मी खाली येईलोक तु अजिबात येथून हलू नकोस "

"नाही माये "

त्या मोठ्या अजनाच्या झाडावर माय चढली. शेंड्यावर जावून आडवा हात लावीत मायने दूरवर नजर फिरवली. नांगराची मोठमोठी ढेकळे आणि घनदाट झाड़ी व्यतिरिक्त मायच्या नजरेला दूसरे काहीच दिसत नव्हते.

"दिसला का ये माँ रस्ता "

मी खालून आरोळी ठोकली.

"नाही रे बुवा, काहीच दिसयना मलं"

माय रडक्या आवाजात झाडावरुन उतरत म्हणाली.

आता आपल्याला गावचा रस्ता भेटणार नाही आणि आपण या रानातच भटकत राहू या भीतेने माय थरथरत होती. मायचा चेहरा सुन्न झाला होता. तिला काहीच सुचत नव्हते, काय करावे अन् कुठे जावे. माय सारखा पदराने चेहऱ्यावरचा घाम पुसत होती. तिच्यात आता गाठोडं उचलायलाही हिम्मत नव्हती. थरथरत्यां हाताने हात जोडीत मायने रानच्या आसराया मायला नवस बोलला.

"ये आसराया माय! सांभाळ ग मलं अशी भटकवू नको. गावचा रस्ता पटकन गवसूदे मी तुलं नारळ फोडीन "

आसराया मायलं नवस बोलल्यावर मायच्या अंगात ताकत आली आणि तिला मनोमन असे वाटले की चकवा आता आपलं काय भी वाकडे करणार नाय. मायने एका हाताने गाठोडं उचलुन माझ्या डोक्यावर ठेवलं अन् तीनेही स्वतःचे गाठोडे खसकन उचलुन डोक्यावर घेतले. एका नव्या उमेदीने ती मला म्हणाली,

"चाल आता लवकर, आपल्यालं दिस माळवायच्या आत गावात जायचं"

समोर येईल ती राने पायाखाली तुडवित आम्हीं पुढेपुढे जात होतो. आर या पार हे ठरवूनच माय अन् मी निघालो होतो. सूर्य आता पश्चिमेकडे झुकत होता पायाखालची सावली आता सात आठ फुट लांब झाली होती. सूर्याच्या झोंबणाऱ्या लाव्हा आता थंड्या वाऱ्यात परिवर्तित झाल्या होत्या. त्यां उन्हातही थंडाव्याचा भास होत होता. पुढेपुढे जमीनही हिरवीगार दिसत होती. चालता चालता माय अचानक थांबली. माय दूरवर काहीतरी पाहत होती. मायच्या चेहऱ्यावर आता आनंद वाटत होता. मायला गावचा रस्ता भेटला हे मला न सांगताच समजले.

"संज्या, ती बघ आपल्या तळयाची पाळू! गवसला रे बाबा एकदाचा रस्ता गावचा "

गावचा शिवार आणि रस्ता बघून आमच्या पायाला वेग आला. आम्ही आता त्यां रस्त्याने पळतच सुटलो.

इकडे माझे वडील आणि भावंडे परेशान झाली होती. वडील दोन तीन शिवार शोधून थकून बसला होता. लिंबाबुद्धाची बायको अन् मुलगा अजून परत नाही आला ही बातमी साऱ्या बुद्धवाड्यात अन् मांगवाड्यात वाऱ्यासारखी पसरली. माझी भावंडे रडायला लागली होती. त्यांची समज घालायला माझ्या काकू आमच्या दारातच बसल्या होत्या.

सूर्याचा मोठा लालबुंद गोळा आता जमिनीत जाण्याच्या तयारीत होता तोच पत्रावर बसलेल्या सुध्याने आरोळी ठोकली,

"ओ काका, आले हो संज्या अन् त्याची माय. खालतलच्या वाटेनं यायले. "

हे ऐकून माझ्या वडिलांनी आणि भावंडांने खालच्या वाटेने धाव घेतली. आमच्या जवळ येऊन अगोदर आमचे गाठोडे घेतले. घरी पोचल्यावर मायने घडलेली कहाणी सांगितली अन् कानाला हात लावला अन् म्हणाली, "पुन्हा एकटी कव्हाच जाणार नाय टेंभरीची पानं तोडायलं रानात "

# 3

ढगाळलेलं वातवरण आता काळकुट्ट होऊन भेगाळलेल्या जमिनीला तृप्त करण्यास आतुर झाले होते. माझा बाप  सारी कामे पटापट उरकून, निवांत पावसाची वाट बघत बसला होता. आज मंगळवार, आज आमच्या गावदेवीचा वार. आमची गावदेवी लय कृपाळु नाव तिचे आईमाय. ती साऱ्या गावचे रक्षण करते, असे लहानपणापासूनच ऐकत आलो. आमची गावदेवी आमच्या गावच्या शिवारात एका मोठ्या डोंगरावर स्थित होती. तिला कुणी स्थापीत केले? कधी केले? हे कुणी विचारत पण नाय आणि कुणी  सांगत भी नाय. पण एक गोष्ट मात्र सर्व आवर्जून सांगतात की, तिला बायकांची सावली सुद्धा चालत नाही. म्हणून तिच्या डोंगराच्या आजुबाजुला बायकांना सक्त मनाई होती. आणि दुसरी गोष्ट तिला आणलेला प्रसाद तिथेच संपवायचा तो प्रसाद घरी नेण्यास पाबंदी असे. आणि या दोन्हीही गोष्टीचे अद्यापही काटेकोरपणे आमचे गावकरी पालन करतांना दिसतात. ती साऱ्या गावाची म्हंजे आमचीही आईमाय. आईही आणि मायही. पण मला एक गोष्ट तिथली नेहमीच खटकत होती. ती माझी आईमाय असूनही मला तिच्या गाभाऱ्यात जावून तिचे दर्शन घेण्यास का मनाई होती? आम्ही मांगा बुद्धाचे पोरं तिचे बाहेरूनच दर्शन घेण्या धन्यता मानीत. याचा कुणी विरोधही केला नाही आणि ही प्रथाही कुणी बंद केली नाही.

आता लवकरच पावसाळयाला सुरुवात होणार म्हणून सारेच गावकरी आईमायच्या डोंगराकडे धाव घेत होते. विशेष म्हणजे तिथे बनवण्यात येणारा

गोडभात आम्हा मुलांना फार आकर्षित करी. त्यामुळे दर मंगळवारी आम्ही मुले त्या आईमायच्या डोंगरावर जात असो. पण आज माझा बापही तिथे गोडभात जेवण घालणार, त्यामुळे मी फार आनंदी होतो.

आज माझा बाप गोडभात जेवण घालणार याची चुणूक लागताच, मी माझ्या साऱ्या मित्रांना सकाळीच आमंत्रित केले होते. त्यामुळे सारे माझे मित्र सकाळी आंघोळ केल्यानंतर माझ्या घरासमोर जमले होते. माझ्या वडिलांनी आम्हा मुलांच्या हातात दोन किलो तांदूळ, एक किलो गूळ, एक नारळ, दोन अगरबत्ती, सनकाड्या, माचीस, कळशी, भगुलं असे सामान देऊन पुढे जायाला सांगितले. आम्ही आनंदीत होऊन प्रत्येकाने हातात  एकएक वस्तु घेऊन आईमायच्या डोंगराकडे रवाना झालो. बौद्धवाडा, मांगवाडा पार केल्यानंतर शेवटची  सामट संपल्यावर बायकांची हागणदारी आली तेथून आम्ही थोड्या कावऱ्या बावऱ्या नजरेने पुढे पुढे जाऊ लागलो. आमच्या टोळीला बघताच झुडपाच्या आडोशाला बसलेल्या बायका ताडकन उभ्या राहत होत्या आणि आम्ही पुढे गेल्यावर पुन्हा खाली बसत होत्या. आम्ही मात्र माझ्या बापानं दिलेलं साहित्य घेऊन चुपचाप पुढेपुढे जात होतो. चालता चालता त्या बायकांना बघून माझ्या मनात गोंगावत असलेला प्रश्न माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठा असलेल्या दिल्या काकाला विचारला,

"दिल्या काका, आपण माणसाच्या हागणदारीत जातो तव्हा आपल्याला पाहून माणसं तं उठत नाहीत!

मंग ह्या बाया का उभ्या राह्यतात? "

माझे हे केवीलवाने उत्तर ऐकून दिल्या काका हसत हसत म्हणाला,

"तुलं आता सांगून काय फायदा नाय. तु मोठा झाला की कळल समदं "

आणि हसत हसत बंड्याला बोलला,

"हो की नाही रे बंड्या "

हो.... हो..... हो... आणि सारेच हसायला लागले. मी मात्र त्यांच्या सोबत पुढे पुढे चालतच राहिलो. बायकांची हागणदारी संपली की साठ सत्तर पावलावर श्मशान भूमी लागली, तशी मनात दडलेली भीती कुजबुज करू लागली अर्ध्या रात्री याच ठिकाणावरून टीटवी जोरजोरात बोंबलत असते. जेंव्हा रातच्याला श्मशानातले भूत जागे होतात तेंव्हाच ती ओरडते, असे सुतारीन म्हातारी आम्हांला सांगत असे. त्यामुळे मी मुलांच्या मधोमध त्यांच्या आडोशाने चालत होतो. तो रस्ता कच्चा होता. बैल गाडीच्या चाकाने तो दुहेरी रस्ता दिसत होता. त्यात भुसभुशीत माती आणि दगड या व्यतिरिक्त काहीही नव्हते. आम्ही त्याच रस्त्याने पुढेपुढे जात होतो. त्या रस्त्याच्या कडेला थोड्या थोड्या अंतरावर गोलआकार जळलेल्या राखेच्या मधोमध दगड उभे केलेले दिसत होते. त्या दगडाकडे बोट दाखवित दिल्या काका आम्हांला सांगत होता,

"ही बघा! मराठ्याच्या गज्याच्या अज्याची राख, मागच्या महिन्यात त्याला इथंच जाळलं व्हतं. ती पुढची गण्या मांगाची राख."

तो दाखवत असतांना आम्ही मुले मात्र काही न बोलता चुपचाप त्याच्या मांगे मांगे चालत होतो. श्मशानभूमी संपल्यावर दिल्या काका आम्हांला म्हणाला,

"हा बघा, मुत्रीचा ओढा, हा संपला की आईमायची शिव चालू व्हणार. पाऊस नसल्यामुळे ओढा कोरडाच होता. त्यातली उन्हाने तापलेली ती शेवाळ कडक व पांढरी झालेली संपूर्ण ओढ्यात दिसत होती. तेथून आईमायचा ओटा आम्हांला टाळसर दिसत होता. मुत्रीचा ओढा संपल्यावर दिल्या काका ने एकच गजर केला,

" बोला आईमाय की, “

आम्ही सर्वानी जोरात प्रतिध्वनी केला,

"जयSSSSSS"

आता आम्ही आईमायचा डोंगर चढत होतो. आमच्या अगोदरही तिथे गोडभात घालायला मराठ्याची पाच पंचवीस मुले आली होती. आम्ही आईमायच्या जवळ गेल्यावर दिल्या काकाने पुन्हा एकदा गजर केला,

"बोला आईमाय की"

"जयSSSSSS"

आता मात्र आम्हांला त्या मराठयांच्या पोरांनीही प्रतिसाद दिला आणि तो डोंगर सार्‍यांच्या आवाजाने दणाणून गेला.

गजर झाल्यावर दिल्या काकांनी ओट्याच्या खालीच अगरबत्ती लावली आणि सर्वांनी आईमायचे खालूनच दर्शन घेतले. मराठयांची मुले मात्र वर गाभाऱ्यात बसली होती. आणि आम्ही मांगा बुद्धाचे खाली. आमच्या गावाची आईमाय म्हणजे गावा शेजारच्या एका डोंगरावर 20/20 च्या मोठ्या ओट्यावर दहा बारा शेंदूर फासलेले दगड. तिथे ना मंदिर ना पुजारी. पण तिथे असलेल्या साऱ्या झाडांच्या फांद्याना चोळीचे खण आणि हिरव्या बांगड्या लटकवलेल्या होत्या. त्यामुळे तो डोंगर दुसऱ्या डोंगरापेक्षा भिन्न भासे. सारे गावकरी तिथे दर्शनाला फक्त मंगळवारीच येत असत. इतर दिवशी तिथे कुणी फिरकतही नसे. दिल्या काकानी तीन मोठ्या दगडाची चुल बनवली. त्यावर भगूलं ठेवलं. त्यानंतर चुल, सनकाड्या टाकून पेटवली नंतर तीन चार लाकडं टाकली. भगूल्यात पाणी सोडले. पाण्याला उकळी आली की त्यात तांदूळ आणि गूळ सोडला. गोडभात बनेपर्यंत माझा बाप आणि बौद्धवाड्यातील आणखी काही मंडळी आली. गोडभात तयार झाल्यावर माझ्या बापाने सर्वांना आवाज दिला,

" या रे प्रसाद घ्यायलं. "

माझ्या बापाचा आवाज एकून सारेजन आमच्या भोवती गोळा झाले. सारेजन एका पंगतीत मांडकूळी घालून बसले. माझ्या बापाने व दिल्या काकाने सर्वांना बिबाच्या पानावर गोडभाताचा प्रसाद दिला. सर्वांनी आईमायच्या गजर घेऊन प्रसादाचा आस्वाद घेतला. आणि आपआपल्या घरी रवाना झाले.

# 4

मनसोक्त वारा वाहत होता. जोरजोराने येणारी ती थंड वाऱ्याची लाट अंगाला मोहीत करीत होती. त्या पिसाट वाऱ्यात रस्त्याने चालणाऱ्या स्त्रीचे रूप पुरुषांना भारावून टाकत होते. तिचे वाऱ्याने उडणारे केस, सारखा डोक्यावरुन खाली येणारा तिचा तो पदर, जणू काही वारं तिला आलिंगनच देत होतं आणि त्याच्या स्पर्शाने ती मनमोहीत होत होती. बारीक मातीचे कण आणि वाळलेला पालापाचोळा त्या सुसाट वाऱ्यासोबत साऱ्या गावात संचार करीत होता. त्यामुळे माझ्या मायने आम्हांला घरातच कोंडून ठेवले होते. मी मात्र दरवाज्याच्या तुटक्या फळीतून ही सारी दृश्य बघत होतो.

गेले चार पाच दिवस वाहणारे वारे अचानक शांत झाले. आम्ही त्या दिवशी बाहेरच बाजा टाकून झोपलो होतो. अचानक आकाशातून मोठमोठ्या एकेका टपोऱ्या थेंबाचे जमिनीवर आगमन झाले. गरम उकळत्या तेलात जसे भजी तळून वर येतात अगदी तसाच पावसाचा एकेक थेंब त्या कोरड्या मातीवर तळून निघत होता. अंगावर पावसाचे थेंब पडत होते तरीही आम्ही साखर झोपेतच होतो पण माझ्या बापाने आम्हा सर्वांना आवाज दिला.

"उठा रे पोरहो! पाऊस या लागला. बाजा भिजतील, चला लवकर घरात!"

माझी माय आम्हांला अगोदर घरात घेऊन गेली नंतर बाजेवरचे गोदडी जमा केली तोपर्यंत पावसाने जोर धरला होता. पावसाच्या तावडीतून आम्ही सुटलो पण आमच्या बाजा मात्र ओल्या होऊन वाकड्या तिकड्या झाल्या होत्या. त्या सरळ करून त्यावर गोदडी टाकताना माझ्या माय बापाचे नाकी नऊ आले. पावसाचे आगमन झाल्यावर जमिनीच्या आणि पावसाच्या पहिल्याच मिलनाने एक न्याराच सुगंध येत होता. तो सुगंधित वास आम्हा मुलांना त्या मातीच्या आणि पावसाच्या पाहिल्या मिलनात जणू आमंत्रितच करीत होता. मनोमन तर माझी आणि माझ्या भावंडांची खूप ईच्छा झाली होती त्या पावसात मनसोक्त भिजायची पण त्या भयाण अंधारात आमची बाहेर जाऊन खेळायला पाचरत होती. पावसाने आता मात्र जास्तच जोर धरला. लग्नात जसा जोरजोरात बँडबाजा वाजावा तसा आमच्या लोखंडी पत्राच्या घरात आवाज येत होता. छोट्या छोट्या टपोऱ्या थेंबाचे आता मुसळधार पावसात रुपांतर झाले होते. माझ्या घरावर तो मुसळधार पाऊस येवढ्या जोरजोरात आदळत होता की, माझ्या शेजारी बसलेला माझा भाऊ काय बोलतो हेही नीट ऐकू येत नव्हते. माझा बाप मात्र पत्राचे काणे कोणे न्याहळीत होता. कुठून पाणी गळते का ते बघत होता. ज्या पत्रांच्या जोडातून पाणी घरात गळत होते तिथे लाकडाच्या ढिपलीचे वटगन लावून पाणी थांबवित होता. जिथे पाणी गळणं थांबत नव्हते तिथे गळत्या ठिकाणी मोठ भगूलं लाऊन घर ओलं होण्यापासून वाचवत होता. माझी माय मात्र देव्हाऱ्या जवळ बसून हात जोडून देवाला प्रार्थना करीत होती,

"देवा असाच पाऊस येऊ देरे पावसाळाभर! अन् जमीन या वर्षी चांगली पिकू दे! "

आमच्या यटाळातल्या जमिनी आमच्या बापजाद्याच्या कोरडवाहू, खडकाळ, मूतलं की चिभडणाऱ्या अन् चांदण्याच्या उजेडात वाळणाऱ्या. त्यामुळे साऱ्या यटाळाची कुणभीक ही पावसावरच अवलंबून असे. पाऊस रात्रभर धो धो करीत पडत होता. घराच्या पत्रावर धो धो कोसळणारा पाऊस अन् त्या पत्राचा कर्कश आवाज, झोपेने कधी गिळून घेतला ते कळलेच नाही. पण माझा बाप मात्र जागा होता. पाऊस चालू होता त्यामुळे बापाच्या डोळयापुढ आता शेतच दिसत होतं. तो मनातल्या मनात विचार करीत होता.

"तीन चार वर्षे मसोबाला बोकडं कापला नाही म्हणून गेल्यावर्षी लय विपरीत घडलं. काढणीला आलेलं पीक देवांनी वाऱ्या वावधानानं साऱ्या शिवाराचं मातीत मिळवलं. म्हसोबा लय कोपला आपल्या यटाळीच्या शिवारावर, काय भी केलं तरी यंदा पेरणीच्या अगोदरच म्हसोबाला बोकडं कापावा लागल" म्हसोबा आमच्या शेतातला साऱ्या यटाळीचा देव. कुणी म्हणते तो आमचा पूर्वज आहे कुणी म्हणते तो आमच्या पूर्वजांनी तिथे स्थापन केला. एवढं मात्र नक्की आहे, जेंव्हा आमच्या पूर्वजाला ती जमीन मिळाली तेंव्हापासूनच तो तिथे असणार. कारण तो फक्त आमच्या यटाळीचाच पूजनीय होता आणि तेंव्हापासूनच हंगामाच्या वेळी पीक कापणी अगोदर त्याला कोंबडे बकरे कापण्याची प्रथा असेल. दरवर्षी माझे चुलते काके त्या म्हसोबाला पीक कापणी अगोदर कोंबडे बकरे कापत पण गेले तीन वर्षे कोंबडे तर दुरच पण साधं नारळही कुणी फोडले नाही. त्याचाच प्रकोप झाला अन् गेल्यावर्षी सोसाट्याचं वारं वावधान झालं अशी माझ्या बापाची समजूत होती. "काही झाले तरी पेरणी करण्याअगोदरच म्हसोबाला बोकड कापायचा नाही तर देव काय विपरीत

करेल याचा नेम नाय " विचार करता करता माझा बापही त्या कर्कश आवाजात झोपी गेला. पाऊस मात्र आमच्या पत्रावर ढोल वाजवतच होता.

........................................................................................

# 5

पूर्वेकडे नुकतेच तांबट फुटत होते. पाऊस आता पूर्ण बंद झाला होता. कालच्या वातावरणात आणि आजच्या वातावरणात जमीन आसमानचा फरक जाणवत होता. काल परवा ज्याचा थांगपत्ताही नव्हता ते बेडूक आज जागोजागी ड्राव ड्राव करत होती. रात्रभर मुसळधार पावसात भिजलेले पक्षी आपले ओले पंख घेऊन थंडीने कुडकूडत तारावर बसून किलबिलत होती. रात्रभर भिजलेली कुत्रेही गोवऱ्याच्या डाळणात बसून दोन्ही पायात नाक खुपसून कुडकूडत होती. गेली सहा महीने तापलेली आणि भेगाडलेली जमीन आणि घामाने ओलेचिंब करणारी ती गर्मी नाहीशी होऊन कधी एका रात्रीतच थंडीने आपले साम्राज्य साऱ्या मुलुखावर प्रस्थापित केले ते कुणालाच कळले नाही.

माझा बाप भल्या पहाटेच उठला. चुली जवळ गेला चुलीत रात्री जळालेली राख अन् कोळसे होते, त्यातला एक कोळसा हातात घेतला हाताने त्याला तोडून तोंडात घातला दाताने त्याला कर्र कर्र चावून बारीक केला अन् एक बोट तोंडात घालून दात घासत घासत यटाळीतला सर्वात वयस्कर चुलत काका नथुकाका कडे गेला. नथुकाकाचा दरारा फक्त यटाळीतच नव्हता तर अख्या गावात होता. त्यांना थोडीफार वैदिक विद्या अवगत होती. गावात कुणीही बीमार पडले, भूत प्रेतला

भ्याले, कुणाच्या भूत अंगात घुसले, कुणाला भानामती करणी केली तर तो नथूकाकाकडे जात असे. या सर्व बीमारीला नथुकाकाकडे एकच इलाज असायचा, सोन तांबडीची एक बट घ्यायची ती हातात घेऊन काहीतरी मंत्र पुटपुटायचा अन् फुंकर मारून त्याला एक एक अशा नऊ दहा गाठी बांधायचा. नंतर त्या बीमार व्यक्तीच्या गळयात ती मंतरलेली बट बांधायचा. त्यानंतर देव्हाऱ्यात जळालेल्या अगरबत्तीची चिमुटभर राख घेऊन, एका ग्लासात पाणी घेऊन पुन्हा मंत्र पुटपुटायचा आणि ती राख थोडी थोडी त्या ग्लासात सोडायचा. मंत्रोच्चार झाल्यानंतर त्या ग्लासातले पाणी आपल्या हातात घेऊन अर्धे पाणी बीमार व्यक्तीच्या डोळयावर मारायचा अन् अर्धे पाणी त्याला प्यायला द्यायचा. झाले, बीमार माणूस क्षणातच ताडकन उठून चालायला लागी. नथुकाका यटाळीत वडीलधारा असल्यामुळे सारेजन त्याला विचारूनच महत्वाचे कामे करीत असत. त्यामुळे माझा बापही महत्वाचे बोलण्यासाठी त्यांच्याकडे आला होता.

"काका........"

"ये"

"नथु काका! ह्यायस का घरात...? "

"कोण?"

"लिंबा......"

"ये ये, आत ये....... "

तसा माझा बाप नथुकाकाच्या घराच्या चार फुटाच्या चौकटीतून खाली वाकुन आत शिरला.

"ये लिंबा ये, बस! ये..... ते पोतं आन  ये लिंबाला बसायल"

"राहुद्येनं काका पोतं कशालं....? दुसऱ्याच्या घरात थोडा बसलों. आपल्याच घरात पोतं कशालं? "

शेणाने सावरलेल्या आंबट ओल्या पोतऱ्यावर माझा बाप तसाच बसला.

"काय लिंबा........ तब्येत बरी हाय ना रे? "

"हो काका.... एक गोष्ट सांगायची होती तुलं म्हणून आलो पाह्यटं पाह्यटं "

"बरं सांग......... "

" काका, आवंदा  पहिलाच पाऊस जोरदार झाला. आता वावरात वळानी झाली की नाही संमदी माणसं पेरणी सुरू करतील. पण महा इचार हाये यंदा पेरणी आधिच आपल्या म्हसोबालं बकरं  कापावं. तुह काय म्हणणं हाये ते मलं सांग म्हंजी मी पुढच्या तयारीला लागतो.”

"तु मह्या मनातलं बोलला लिंबा! अरे, आपण तीन वर्षे त्या देवाकडं साधं फिरकून भी पाह्यलं नाही. म्हणूनच देवानं आपलं सोन्यासारख पीक गेल्यावर्षी धूळीस मिळवलं. बर् झालं तो आपल्या पिकांवर कोपला. जर त्यों आपल्यावर कोपला असता तर किती विपरीत झालं असतं...... "

"हो काका...... मलं पण तेच वाटते....... म्हणुनच मी तुह्यापाशी आलो. तु एकदा हो म्हणलं की मी पुढच्या कामाला लागतो. "

"अरे यात काय पूसायचं! देवाच्या कामासाठी मी काय तुलं नाही म्हणतो का.....? जाय, तयारीला लाग! तुलं कशाची भी गरज पडली तर मी हो. भाकर, कोड्यास बनवायला तुह्या बायको सोबत तुह्या काकीला पण घेऊन जा! "

"हो काका येतो मग? "

एकदाचा मुसळधार पडून पाऊस शांत झाला होता. सकाळ होताच साऱ्यांच्या घरावर सोनेरी रंगाचे कोवळे ऊन पडले होते. सकाळी सकाळी बायका माणसांची विहीरीवर एकच धांदल उडाली होती. एखादा छोटासा गुळाचा खडा जमिनीवर पड़ता त्या खड्याभोवती जसे मुंगळे गोळा होतात तसेच काहीसे पाणी भरण्यासाठी त्या विहीरवर बायका माणसांची गर्दी झाली. सर्वजण बाल्टीने पाणी काढून आपापल्या हांड्यात ओतत होते. पाऊस पडून गेल्यामुळे सारीकडे चिखलामुळे चीकचीक झाली होती. चालताना खाली बघून चालावे लागत असे नाहीतर कोण कधी कुठे पडेल याचा नेम नाही. यटाळातल्या भावकीच्या आणि माझ्या बापाच्या विचाराने आजचा दिवस मसोबाला बोकड कापायचा दिवस निश्चित झाला होता. त्यामुळे माझा बाप आणि माय सकाळपासूनच कामाच्या गड़बड़ीत होते. सर्व सामानाची बांधाबुंध झाल्यावर माझा बाप गोरेगावला बच्छर भाईला सांगण्यासाठी गेला.

माझ्या बापाने यटाळीतील सर्व जण व गावातील निवडक लोकांना सकाळीच आमंत्रण दिले होते. लिंबा आज मसोबाला बोकड कापणार, हे समजताच परश्या मांगाने पहाटेच जाऊन आमच्या शेतात दारू काढण्यासाठी हातभट्टी लावली. माझा बाप दोन दिवस अगोदरच कापण्यासाठी बोकड घेऊन आला होता. नुकताच वाढी लागलेला कोवळा बोकड तो, त्याचे नुकतेच शिंगोटे वर येत होते. मायच्या अन् बापाच्या आदेशानुसार त्याला मीच चारण्यासाठी घेऊन जात असे. मायने लांबलचक दावं त्याच्या गळयाला बांधून माझ्या हातात दिलं होते. आणि मला म्हणाली होती,

"याचं चऱ्हाट सोडू नको! वढ्या जवळच्या पांदी पांदीनं चारुन घरी घेऊन ये "

त्यामुळे गेली दोन दिवस मी त्याची सेवा करीत होतो. मला तो आता मित्रासारखा झाला होता. पण आज त्याला कापणार याचे दुःखही वाटत होतं. त्याला कापु नये म्हणून मी मायला बोलत होतो.

"माँ! "

"काय रे? "

"या बोकड्यालं कापू नको म्हणून बापूलं सांगनं! "

"काहून! "

"आये, मलं आता त्यों सोबत्या सारखा झाला. मी त्यालं रोज नेईन चारायलं. सांगन बापूलं कापू नको म्हणून! "

माझी माय माझ्या तोंडावर मायेने हात फिरवून मला बोलली,

"नाही माय, तूह्या बापानं तुम्ही सुखाचे रहाव म्हणून ह्यो बोकड आणला. आपला पूर्वज आपल्यावर कोपला ना, म्हणून ह्यो आपल्या शेतातल्या मसोबाला कापायचा. चाल लवकर आवर, त्याला शेतात घेऊन जायायचं "

माझ्या मायच्या सोबतीला माझ्या तीन चार काक्या होत्या. साऱ्याजनी हळद, मीठ, मसाला, लसूण, कांदा, भगूलं, पळी, टोपलं, हांडा, ज्वारीच पीठ असे मेजवानीचे सारे साहित्य घेऊन शेताकडे रवाना झाल्या. जाण्या अगोदर माझी माय मला बोलली,

"लवकर ये रे त्या बोकड्याला घेऊन शेतावर. तुहा बाप एक दोन घंट्यात येईल शेतात बच्छर भाईला घेऊन. "

मी मान हलवली तशा त्या साऱ्याजनी सामान घेऊन शेताकडे रवाना झाल्या. घरा समोर एक खुट्टी ठोकून तिथे त्या बोकड्याला बांधले होते. त्याच्या जवळ मी गेलो त्याच्या पाठीवरून हात फिरवला. त्याच्या पाठीवरून हात फिरवत असतांना तो आनंदाने मे.... मे..... मे.... करीत होता. मी त्याला सोडले हातात चऱ्हाट घेऊन शेताच्या दिशेने निघालो. दुःखी होऊन मी त्याला पुढे पुढे घेऊन जात होतो. तो मात्र आनंदाने उड्या मारीत रस्त्याने माझ्या पुढे पुढे चालत होता. विविध झाडे वेलीच्या पानांचे लचके तोडायला तो आतुर झाला होता. पण त्या मुक्या जीवाला काय माहीत की, आज त्याला कापण्यासाठी मी घेऊन जात आहे. मुळात त्याला कापण्यासाठीच विकत घेतले होते. शेतात पोचल्यावर मी त्याला बांधावर

चारत बसलो होतो. थोड्या वेळाने माझ्या मायने मला खालच्या शेतातून आवाज दिला,

"ये पोरा..... येरे त्याला घेऊन इकडं "

मायचा आवाज ऐकल्यावर मी लगेच खालच्या शेतात माय जवळ गेलो. माझ्या मायने अन् काक्यांनी मिळून सारी तयारी केली होती. कांदे, अदरक, लसूण, कापून मीठ मसाल्यासहित सारे साहित्य मोठ्या भगूल्यात तड़क्यासाठी आतुर झालं होतं. आम्ही सर्वजन आता माझ्या बापाची वाट बघत बसलो होतो. तोच दोन माणसांच्या बोलण्याचा आवाज आमच्या कानी आला. मी जरा समोर टेकडीवर जावून बघितलं तर माझा बाप अन् बच्छर भाई पांदीतून येत होते. त्यांना बघताच मी माझ्या मायला आवाज दिला,

"ये माये..... आले ये बापू ! "

हे ऐकताच माझ्या मायने दिवा, अगरबत्ती, शेंदूर, कुंकू एका प्लेट मधे मांडायला सुरवात केली. माझ्या बापासोबत आलेला बच्छर भाई म्हंजी मोठा तगडा माणूस. अंगावर कमीज़, खाली लुंगी घातलेली, उंच अंगात भरलेला पैलवानांसारखा, डोक्यात गोल मुस्लिमांची टोपी, मिशा काढलेल्या, ईतभर लोंबलेली दाढ़ी, त्या दाढ़ीवर तो सारखा हात फिरवत असे. ओठ, जीभ, दात सर्व तोंड पान खाऊन खाऊन लाल भडक झालेलं. आणि हातात एक भली मोठी सुरी. त्याचं सूरीने तो बोकड्याला हलाल करणार होता. तोंडात पान चघळत चघळत तो त्या बोकड्याला न्याहळीत होता. न्याहळता न्याहळता माझ्या बापाला म्हणाला,

"अरे लिंबा भाई...! कित्ते का लिया? ये तो बच्चा लग रहा हैं! "

"अरे हाँ बछेर भाई, उधार खाते पे लिया... हंगाम को उसको रोकडा देनेका. देव को चलता हैं! "

"अच्छा अच्छा चलो फिर, मसोबा के पास जल्दी मुझे चोरजवला भी जाना हैं वहाँ एक गोहरा खरीदा हैं! "

बछेर भाई ने असे म्हणताच माझ्या बापाने सारे बारदाण हातात घेऊन आम्हांला म्हणाला,

"चला रे "

तसे आम्हीं (मही माय सोबत आलेल्या काकू आणि मी ) त्यांच्या मागोमाग चालत होतो.

मसोबाला जाण्यासाठी आम्हांला ओढा पार करायचा होता. नुकताच मुसळधार पाऊस येऊन गेल्यामुळे ओढा खळखळून वाहत होता. कमी खोली बघून माझा  बाप आम्हांला म्हणाला

"येथून या! इथं पाणी जास्त खोल नाय "

असे म्हणत त्यांनी बोकड्याचे पाय हातात पकडून त्याला उचलुन खांद्यावर घेतले आणि तो ओढा पार करीत होते त्यांच्याबरोबर आम्हीही ओढ्यात उतरून त्या बाजूला गेलो. अजनाचे झाडे, वेळूची दाट झाडे, झुडपे पार करीत करीत शेवटी आम्हीं

मसोबा जवळ आलो. मसोबा हा ओढ्याच्या पलीकडच्या बाजूला माझ्या यटाळीतल्या चुलत्याच्या रानात होता.

घनदाट गोचीडीच्या दाट झाड़ीच्या आत पाच दगड उभे करून बसवलेला तो मसोबा. गेली तीन वर्षे कुणी त्याच्याकड ढुंकूनही पाहीले नाही त्यामुळे गोचीडीने त्याला वेढून घेतले होते. ते पाहून माझ्या बापाने विळा हातात घेऊन कचाकच गोचीडीची फोकं साळली अन् देवापुढची जागा मोकळी केली. त्यानंतर मह्या मायने वाटीतल्या शेंदूरमधे गोडतेल टाकून त्याचे मिश्रण केले आणि त्या पाच दगडाला लावणे. शेंदूर लावल्यावर ते पाचही दगड टवटवीत दिसत होते. मह्या बापाने ताटातले हळद कुंकू सर्वात अगोदर त्या बोकड्याला लावले. तांब्यातले पाणी पाजले नंतर मसोबाचे दर्शन घेतले.

सर्व पूजा झाल्यावर माझ्या बापाने अन् बछर भाईने त्या बोकड्याला घट्ट बांधले व आडवे पाडले. बोकड्याचे चारी पाय घट्ट बांधल्यामुळे तो पडल्या ठिकाणीच ओरडत होता व बांधलेल्या दोरामधून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करीत होता. बछर भाई धारधार चाकू घेऊन त्याच्या मानेजवळ बसून माझ्या बापाला म्हणाला,

"लिंबा भाई जरा इस बोकडकी गरदन पकड़ना "

तसे माझ्या बापाने त्या बोकड्याचे मुंडके घट्ट दाबून पकडले. आता मात्र त्या बोकड्याचे हालचाली बरोबर तोंडही बंद झाले. हे सारे दयनीय चित्र बघून मह्या काळजाचे पाणी पाणी होत होते. एक निष्पाप जीव देवाच्या नावावर माझ्या समोर कापल्या जात होता. मला मात्र त्याची दया येऊनही त्याला बघण्या व्यतिरिक्त

काहीही करू शकत नव्हतो. शेवटी बछर भाईने तो धारधार चाकू त्याच्या मानेवरुन फिरवला. तशा रक्ताच्या चीळकांड्या माझ्या बापाच्या अन् बछर भाईच्या अंगावर उडाल्या आणि जिव वाचवण्यासाठी तडफडत असलेला तो बोकड कायमचा शांत झाला.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजानी हिंदू धर्म त्यागून बौद्ध धर्म स्वीकारून 40/ 45 वर्षे होत आली तरीही खेड्यागावातला धर्मांतर झालेला महार समाज अजूनही महारच होता.

आंबेडकरी विचारांचा, बौद्ध तत्वाचा आणि त्यांचा दूरदूर पर्यंत संबध नव्हता. घराच्या देवळीत एक देव्हारं आणि भिंतीवर बाबासाहेब आणि गौतम बुद्धाचा फोटो. खंडोबा, मसोबा सारखेच अजून दोन देव आपल्या समाजात आलीत असेच त्यांची समजूत होती सकाळी देवळीतल्या देवांबरोबर त्यांचीही पूजा होत होती.

बोकड कापला, बछर भाईने मस्त त्याची बोटी बोटी करून दिली. बोकड्याच मुंडके अन् थोडं मटण घेऊन तो त्याच्या गावी रवाना झाला. कापलेल्या मटणाचा ताबा आता माझ्या काकूनी अन् मायने घेतला. ते सारे मटण टोपल्यात भरून पुन्हा आमच्या शेतात घेऊन गेल्या. दोन दिवस माझ्यासोबत मौज मजा करणाऱ्या बोकड्याचे मटण होते ते. ढीगभर सोललेला लसण आणि अदरक च्या तडक्याने भाजीचा सुगंध साऱ्या रानभर पसरला होता. सूर्य आता वापसीला जायच्या तयारीत होता मटण भाजी भाकरी बनवून तयार होती. थोड्याच वेळाने नथूकाका

विठ्ठल काका अशी भावकितली वडीलधारी मंडळी रानात आली. त्यांच्या हाताने मसोबाला नैवेद्य दाखवला एक भाकरी त्यावर दोन तीन मटणाचे खड़े आणि अगरबत्ती लावून सर्वांनी मसोबा आणि आसराया मायचा जयजयकार केला. सर्वच भावकिच्या चेह्ऱ्यावर आनंद दिसत होता.

"चला, यटाळीत कुणीतरी देवाला बोकड कापला ते एकदाचं बरं झालं "

असे जोतो एकमेकास बोलत होता. थोड्या वेळाने गावातून तेलमुंग्या सारखी लाईनच लागली होती माझ्या शेतात. ज्याला आवतण दिले तोही आणि त्याला नाही दिलं तोही मटणावर ताव मारण्यासाठी येत होता. परश्या मांगाकडून पावशेरी मारून सर्वजण मटण भाकरीवर ताव मारत होते अन् डुलत डुलत निघून जात होते. माझा बाप मात्र एकदाचा कार्यक्रम पूर्ण झाला अन् सर्वजण जेवुन आनंदात जात आहेत त्याच खुशीत होता. झालेल्या खर्चाची अन् उधार घेतलेल्या बोकड्याच्या पैशांची त्यांना अजिबात चिंता नव्हती.

# 6

मार्गशीर्ष महिन्यांचे ते दिवस होते. हिरवेगार गवत माणसांच्या डोक्यावर जाऊन डुलत होतं. भुंगे, सोनकिडे, फुलपाखरे, नाकतोड़े, मधमाशांनी त्या घनदाट अन् हिरव्यागार रानात नुसता हैदौस घातला होता. धूऱ्यावरचे गवत इतके वाढले होते की, या वावरातून त्या वावरात आवाज़ही जात नव्हता. सुगीचे दिवस जवळ आले होते मिरगात पेरलेले पिक, हळूहळू कापणीला येत होते. यटाळीतले सर्व आता पिक कापणीचीच वाट बघत होते. ज्वारीचे कणसं दाण्याने भरगच्च भरून डूलत होती. सहा फूट उंच गेलेला बरु वाऱ्याच्या लहरीवर खुळूखुळू आवाज़ करीत त्या हिरव्यागार रानात नाचत होता. नुकतीच पिवळी झालेली सोयाबीन, आपली पाने झडून कापणीसाठी सज्ज होत होती. सारी भावकी आनंदी होती, यावर्षी काळी आई त्यांच्या पदरात भरभरून टाकणार होती. माझे चुलते काके शेतातला माल काढण्या अगोदरच 'कोणत्या वावरात किती माल होईल? ' याचा हिशोब करीत होते. त्या वर्षी माझ्या बापाच्या पायाला ' वकटं ' झालं होतं. डाव्या पायाच्या तळपायाला जखम होऊन पाय गुडग्यापर्यंत सुजला होता. त्यामुळे बापाला शेतात येणं अशक्य झालं होतं. त्यावर्षीची सारी कूनभिक माझ्या मायवर, दोन मोठ्या बहिणीवर आणि भावावर आली होती. बापाच्या पायाला मोठी जखम झाली त्यामुळे त्यांना चालता येत नाही

हे बघून आम्ही फार चिंतेत होतो. आडगावचा माझा मामा वैद होता, बापाला दवाखान्यात फरक पडत नाही पाहून त्याने माझ्या माय बापाला सांगितले की, ही बीमारी दवाखान्यात थांबणारी नाही. तुम्हांला कुणीतरी 'करतूकी' केली आहे. देवीच्या सात वाऱ्या कराव्या लागतील. माझा बाप कशाचाही विचार न करता देवीच्या वाऱ्या करू लागला सोबत डॉ. मुसाभाईचे दर हप्त्याला इंजेक्शनही चालूच होते.

सारे शेतकरी तीन चार दिवसात पिक कापणी करणार, तोच आकाशात मोठ मोठे काळे ढग एकवटू लागले. आज ना उद्या पाऊस येणार हे साऱ्यांना दिसत होते. हे बघून सारे शेतकरी चिंताचूर झाले, काय करावं कुणालाच कळेना. एक दिवस असेच घरात आम्ही  सारे चिंतेत बसलो होतो अन् बाहेरून पलीकडल्या चोंढीतल्या विठ्ठल बापूचा आवाज़ कानावर आला,

"कसा हायेस रे लिंबा...... काय म्हणती तुही तब्येत? ? ? पाय थांबला का नाही अजून.....! "

त्यावर माझा बाप बाहेर नजर फिरवत म्हणाला,

"कोण? ? ? इठ्ठल काका... आहो याया! या बसा..... ये पोतं दे ये बसायलं काकालं! काका.. कसं काय येनं केलं? ? ? "

"इकडं गोरेगावला गेलो व्हतो... म्हणलं तुही तब्येत पाहून जावाव काय म्हणते पाय तुहा लिंबा आता...? "

"बरा हाये काका आता बरा हाये... देवीच्या वाऱ्या चालू केल्यापासून सूज कमी व्हया लागली. "

खाली बसताना एक हात जमिनीवर टेकवून, कण्हत विठ्ठल काका पोत्यावर बसीत पुन्हा बोलला,

"लिंबा.. आभाळ याय लागलं... बहुतेक गारगुंडा होईल वाटतं "

"हो नं हो काका... त्याचचं भेव वाटायलं मलं, यावर्षी मी पायानं आदू झालो. जर घाईगड़बड़ीत धान कापायची येळ आली तं पोह्यांची लय दैना व्हइल... "

माझा बाप सांगत होता आणि विठ्ठल बापू ऐकत होता. थोड्याच वेळात मायनं चहा दिला. चहा पीत पीत विठ्ठल बापू म्हणाला,

"मेंढ्यावाले लोकं सवण्याच्या शिवारात हायतं.. जर गारगुंडा आला तर ते आपल्या दोन्ही चोंढ्याकड गारगुंडा कलवतील... "

उंट आणि मेंढ्या घेऊन राजस्थान वरून आलेल्या लोकांकडे गारा वळवायची कला (जादू) आहे असा गैरसमज आजही आमच्या गावच्या लोकांमधे आहे. आणि ते ज्या गावात मुक्कामी असतात त्या गावात कधीच गारा पडत नाहीत. तेंव्हा गारगुंडा (गारपीठ ) हा शब्द मी ऐकूनच होतो पण प्रत्यक्षात कधी गारगुंडा मी बघितला नव्हता. गारगुंड्याचे नाव काढले की साऱ्याची छाती धडधडायला लागे. पण गारगुंडा बघायला मी फार उत्सुक होतो, आणि तो दिवस उजाडलाचं. आज वारे स्तब्ध होते सारे आकाश काळयाकुट्ट आभाळानी झाकाळून गेले होते. भर

दुपारी सर्वत्र अंधार पसरला होता. झाडावर पाखरांची किलबिलाट चालू झाली. उभ्या पिकांचा पाऊस सत्यानाश करणार् हे सत्य त्या गडगडणाऱ्या आभाळाकडे बघून साऱ्यांना कळायला लागले. विज लवताना आणि ढग गडगडताना बघून साऱ्यांनी शेतातून घराकडे धाव घेतली. आम्ही रस्त्याने सुसाट घराकडच्या दिशेने धावायला लागलो आणि तितक्यात त्या स्तब्ध वाऱ्यांनी अचानक रौद्ररूप धारण केले. वारा आता सुसाट वाहायला लागला. मोठमोठी झाडे त्या वाऱ्यामुळे इतकी खाली वाकत होती की, जणू काही मोडून रस्त्यावर पडतील.. आम्ही धावत पळत कसतरी घर गाठलं. घरी माझा बाप चिंतेत बसून आमची वाट बघत होता आम्ही घरी सुखरूप आल्याचे पाहून माझ्या बापाला आनंद झाला. वारा सुसाट होता त्यामुळं आम्ही दार खिडक्या बंद करून कोंड्याला तुराटीच्या काड्या घातल्या. माझ्या मायने आम्हांला बाजेखाली जाऊन बसायला सांगितले. जेणेकरून त्या वावधाणात जर घरावरचं एखादं पतर वाऱ्याने उडालं तर आम्ही बाजेखाली सुरक्षित राहू.. स्सुssss करीत वारा आणखी आपले रौद्र रूप दाखवू लागला आणि अचानक धडाम्म् आवाज़ आमच्या घरासमोर आला. अचानक झालेल्या आवाजाने आम्ही एकदम घाबरलो, माझ्या अंगावर तर काटाच उभा राहीला. मी रडक्या आवाजात मायला म्हणालो,

"काय झालं वं माये.....? "

"थांबा रे बाजेखालीच बाहिर येऊ नका.. मी पाह्यते काय झालं ते... "

मी घाबरलेला पाहून माझ्या बहीणीने मला जवळ घेतलं. मायने हळूच एक खिडकी उघडून बाहेर डोकावून बघितले आणि बापाला आवाज़ देत म्हणाली,

"आहो.... आइकता का "

"काय झालं ये..... " बाप दचकून म्हणाला.

"आहो, कुणाचं तरी पतर आलय उडून आपल्या घरापुढं"

"जाऊ दे त्यालं... तू खिडकी लावून घे! नायतर आपलं पण उड़ल.... "

मायने पुन्हा खिडकी लावून घेतली. हळूहळू वाऱ्याबरोबर टपटप पावसाच्या थेंबाचा आवाज़ पत्रांवर येऊ लागला. जसा जसा पावसाचा जोर वाढू लागला तसा तसा वारा मंदावू लागला. टपटप आवाजाचे रूपांतर आता रपरप आवाजात झाले आणि मुसळधार पावसाला सुरवात झाली. पण नेहमी पडणाऱ्या पावसात आणि या पावसात आम्हांला फरक जाणवत होता. आमच्या पत्रावर कुणीतरी एकसारखे दगड मारावे असे आम्हांला वाटत होते. तो आवाज़ ऐकून माझा बाप कपाळावर हात मारून म्हणाला,

"गारा पडायल्यात बाहीर... झाला, समदा सत्यानाश झाला. समंद धूळीस मिळालं.. "

वारा थोडा शांत झाला होता मात्र पत्रावर गारा पडत असल्यामुळे पत्राचा महाभयंकर आवाज़ येत होता. आम्ही सारे बाजेखालीचं बसलो होतो. मायने पुन्हा खिडकी खोलली आणि आम्हांला काहीतरी बोलत होती. पत्राच्या आवाजामुळे तिचा आवाज़ आमच्या पर्यंत पोचत नव्हता त्यामुळं तिने हाताने इशारा करीत आम्हांला खिडकी जवळ बोलावले. गारा बघायला आम्ही अगोदरच उत्सुक होतो. आम्ही

धावतच खिडकी जवळ गेलो आणि खिडकीतून बाहेर डोकावून गारा बघत होतो. पावसाच्या थेंबाबरोबर पांढरेशुभ्र सुपारी सारखे बर्फाचे गोळे आकाशातून खाली पडत होते. थोड्यावेळात जमिनीवर गाराचा ढीगच ढीग जमायला लागला. आकाशातून गारा इतक्या जोरजोरात पडत होत्या की, जर तिच्या तडाख्याखाली एखादा माणूस आला तर तो मेल्याशिवाय राहणार नाही. माझा बाप आता दुहेरी दुखाने त्रस्त झाला होता. एक तर पाय त्यांना त्रास देत होता, आणि यंदा सोन्यासारखे आलेले पिक हातचे गेले होते. या दुखात बाप कपाळावर हात लावून एका कोण्यात विचार करीत बसला होता. आम्ही मात्र खिडकीतून बाहेरचा नजारा बघून आनंद लूटत होतो. बाहेर आता जागोजागी गारांचा ढीग जमा झाला होता. पाऊस दोन तीन घंटे पडून आता मंदावला होता.  गारगुंडा पूर्णता बंद झाला होता. रस्त्यावरून एखाद्या नदीप्रमाणे खळखळून गढुळ पाणी वाहत होते. पत्रावर, ओट्यावर, डाळणावर, जागोजागी गाराचा ढीग जमा झाला होता. तीन तासानंतर सर्वांनी दारे उघडली सर्वजण आता त्या जमा झालेल्या गारा हातात घेऊन न्याहळीत होते. ज्यांची ज्यांची घरावरून पत्रे उडून गेली ते आपापल्या पत्राची शोधाशोध करीत होते. पाऊस थांबल्यावर माणसांची किलबिल चालू झाली. सर्वच आपआपल्या घरातून बाहेर पडून गारगुंड्याने झालेल्या नुकसानीचा नजारा बघत होते. ओढ्याला मोठा पूर आला होता. मी बाहेर जाऊन गारा तोंडात घेऊन त्याची चव चाखीत होतो तोच मायने घरातून आवाज़ दिला,

" ये पोरा घरात व्हय लवकर.. बीमार पड़शील, खाऊ नको त्या गारा.. "

मायेचे ऐकून बापाने ही आवाज़ दिला,

"ये रे घरात त्या गारा खात नसतात"

संध्याकाळचे सात वाजले होते. सर्वजन घरात होते पण सर्वांचे लक्ष शेतात होते. किती नुकसान झाले असेल? पिक काही हातात लागणार का सारे जमीनदोस्त झाले असेल? या विचारातच ती रात्र गेली. रात्रभर माझे माय बाप झोपलेच नाही ते सकाळ होण्याची वाट बघत होते. काही केले तरी जोपर्यंत ते शेतातले पिक स्वतःच्या डोळयाने बघणार नाहीत तोपर्यंत त्यांना चैन पडणार नाही. सकाळ झाली सर्व झोपेतून उठले पण सकाळी होणारी रोजची दैनंदिन कामे कुणीच करीत नव्हते. सर्वजण उठून जमेल तितक्या लवकर शेतात जाण्याचा प्रयत्न करीत होते. आम्ही सकाळचे घाई गड़बड़ीत नाश्तापाणी करून शेतात निघण्याची तयारी केली. मोठ्या भावाने बैलगाडी जुपली आणि आम्ही सारेच शेतीच्या दिशेने रवाना झालो.

गाडी जशी जशी पुढं जात होती तसे तसे गारपीठनी झालेले नुकसान नजरेस पडत होते. मोठ मोठ्या झाड़ाच्या फांद्या तुटून खाली पडल्या होत्या. रात्री वाहोनी पाऊस झाल्यामुळे जागोजागी आचकट जमा झालं होतं. निलगिरी सागवानचे उंच झाडे एका दिशेला वाकलें होते. बैलगाडीतून आम्ही दुसऱ्यांच्या शेताकडे नजर फिरवतो होतो, सारे पिक जमीनदोस्त झालेले आमच्या नजरेस पडत होते. शेवटी आम्ही शेतात पोचलो आणि समोरचे दृश्य बघून काळजाचा ठोकाच चुकला. साऱ्या रानाची धूळधान झाली होतो. डोक्याच्या वर गेलेला बरु, तुटून साऱ्या

रानात पसरला होता. ज्वारीच्या कणसाचे दाने सर्वत्र पसरले होते सोयाबीनही सारी तुटून मातीत मिसळली होती. काल, आनंदात बागडणारे भुंगे, किडे, फुलपाखरे, सोनकिडे, नाकतोडे सारे खाली मरून पडले होते. झाडावरचे पक्षीही जागोजागी मरून पडले होते. जमिनीवर आणि झाडावर रेंगणारा, सरडा, खार, कन्नापालही मरून इकडे तिकडे पडल्या होत्या. हा कर्दणकाळ बनून आलेला गारगुंड्याने फक्त आमच्या तोंडचा घासच हिरावून घेतला नव्हता तर रानातील असंख्य जिवांनाही त्याने संपवले होते. या रानातून ते  रान नजरेस न पडू देणारं ते गवत सारं जमीनदोस्त झालं होतं. अख्या यटाळाची जमीन आता डोळ्याने टाळसर दिसत होती. त्या मातीतून एक एक दाणा उचलून आम्ही जमा करू लागलो.. काठी टेकवत टेकवत नथूकाका माझ्या रानात आला. आम्हांला पाहून म्हणाले,

"काय करायलेरे पोरं हो... "

"काय नाय मामाजी, सोयाबीनचे पडलेले दाने येचायलो...! " माझी माय त्यांच्याकडे बघून मनाली...

"आरे.., कोण घेईन या फुगलेल्या दाण्यालं. कशाला करता फुकटची मेहनत. सडूद्या ज़मीनीतच त्या दाण्यालं "

"असं कसं सडू देवाव मामाजी.... पेरणी पासून येवढी मेहनत केली असं सोडून देऊ वाटते का...? "

"कोणतं पाप केलतं आम्ही काय ठाऊक...!

देव आमची अशी परीक्षा घेते. समंदा सत्यानाश झाला रे.... "

असे बोलत बोलत नथूकाका सोपानच्या वावरात गेला. आम्ही दुखाचा आवंढा गिळून विस्कटलेले पिक जमेल तितके गोळा करण्याच्या प्रयत्नात होतो....

# 7

रात्रीचे नऊ वाजले होते, दिवसभर राना वनात घाम गाळून मेहनत करणारा माझा यटाळ शांत झोपी गेला होता. नुकतीच अमावस्या संपून चंद्र पौर्णिमेकडे कूच करत होता. सूर्याच्या उजेडात गायब झालेले काजवे आपल्या ढूंगणातून टीमटीमत सैरावैरा धावत होते. रातकिडे गल्लीबोळयाने किरकीरत होते. छोटे छोटे बेंडक अंगणात राजणाच्या बुडाशेजारी ड्राव ड्राव करीत होती.. अशावेळी घराबाहेर मूतायला जाण्याचा विचार जरी माझ्या मनात आला तरी अंगावर काटा उभा राहत असे. मी घरात माझ्या मायबापाच्या मधात जरी सुरक्षित झोपलेला असलो तरी, माझ्या डोळयासमोर बाहेरचा तो अंधारच दिसत होता आणि त्या अंधारात बंड्याचं विवळणारं कुत्र माझ्या अंगाला थरकाप आणीत होतं. मला झोप जरी लागली नसली तरी आईच्या पोटात बाळ झोपावं तसा मी एका आडोंगावर पोटाला गुडगे लावून झोपलो होतो.. आज बंड्याचं कुत्र जास्तच विवळत होतं ते बघून माझ्या भीतीचा पारा आणखीनच चढला. दिवसभर रानात काबाड़ कष्ट करून थकलेले माझे माय बाप आणि भाऊ बहीण निवांत घोरत होते. मी हळूच मायचा हात हलवित म्हणालो,

"माये..... ये माये.... "

"हं.. काहे...! " माय झोपेतच म्हणाली.

"माँ.. आज बंड्याचं कुत्र लयच ईवळायलं ये "

"झोप मूकाट्यानं, त्या सूतारीन मथारीलं काय काम नाही. दिवसभर पोहरायलं भूताच्या गोष्टी सांगते अन् रातरशा पोहरं असे भितात मंग... झोप मुकाट्यानं.. "

मायचे ओरडने बघून मी गप्प झालो अन् डोळे लावून झोपायचा प्रयत्न करू लागलो. खरे तर मला सूतारीन म्हातारीनेच हे सांगितले होते, 'जर कुत्र ईवळत असलं की समाजायचं भूत आलं.. कुत्र्याला भूत दिसत असते' त्या कुत्र्याला विवळताना मला वाटे, खरेच भूत येऊन आमच्या दारात उभे राहिले... थोड्या वेळाने सर्व काही शांत झाले आणि अचानक भागूबाईचा जोरजोरात कण्हण्याचा आवाज़ आला.

"हाँ... आ.... हाँ.. आ.... हाँ.... आ.... हाँ... आ... "

भागूबाई म्हणजे बंड्याची आजी. बंड्याच्या घराशेजारी एक झोपड़ी बांधुन त्यात एकटीच रहात असे. तिचं अख्ख झोपडं वेगवेगळया देव्यांच्या फोटोनी अन् लिंबामीरच्यानी भरलेले असे. तिच्या अंगात नेहमी काही ना काही येई, कधी माहोरची रेणुका तर कधी आंबाबाई  कधी तुळजाभवानी. आजही कोणतीतरी देवी तिच्या अंगात आली होती. अंगात आलं तरीही कुणी येत नाही पाहून भागूबाई जास्त जोरजोरात चिर्कून कण्हायला लागली. तिचा आवाज़ ऐकून सारी भावकी जागी झाली. भागूबाईचा आवाज़ ऐकून माझी माय उठली आणि म्हणाली,

"आता माय, आता या येळला कोणती देवी आली आसल माय. चाल बर्.... जाऊन पाहू! काय म्हंती देवी ते. "

माय सोबत मीही भीतभीत भागूआजीच्या झोपड्याकडं गेलो. भागूबाईच्या झोपड्याजवळ साऱ्या यटाळीतल्या बाया जमा झाल्या होत्या. भागूबाई केसं मोकळे सोडून, मान खाली घालून कमरेपासून अंग गोलगोल फिरवून झूलत होती. बंड्याच्या मायनं अगोदर तिला (तिच्यातल्या देवीला) हळद कुंकू लावलं आणि पाया पडली. बंड्याच्या मायचं बघून साऱ्या बाया तिला हळद कुंकू लावीत अन् पाया पड़त होत्या. मी तिचे तसे रूप बघून  लांबूनच तिच्या पाया पडलो. सर्वांचे पाया पडणे झाल्यावर बंड्याच्या मायनं तिला विचारल,

"माँ.. कोण हायेस तू...? अन् का आली एवढ्या रात्री "

भागूबाई झूलतच त्यांना बोलत होती,

"हाँ... आ.... हाँ... आ.... मी हाये, ओळखल नाही काय मलं तुम्ही.. "

मधेच नर्मदा माय तिच्या पाया पडत बोलली,

" माफ करा माय... काही चूकलं बिकलं असल आमचं तं, तू कोण हाये अन् तूलं काय पाहीजे ते सांग... "

"मी सवान्याची महू माय हाये.. हाँ... आ.... हाँ... आ... महा सदैव वास तुमच्या यटाळीत होता अन् राहील. हाँ... आ.. हाँ... आ... "

हे ऐकून तिला बंड्याची माय बोलली,

"का वं माँ...! तू बोलती तूव्हा आमच्या यटाळात वास हाये... मंग आमचे सोन्यासारखे पिक काहून गारगुंडा करून घालवले? ? ? ? "

"हाँ... आ... हाँ... आ... प्रकोप हाये त्यो मव्हा. चार वर्ष झालेत तुम्ही मह्याकड फिरकून नाही पाह्येलं. या पौर्णिमेला या संबदी हाँ... आ... हाँ.. आ"

"हो.. माये येतो आम्ही तूह्या भेटीला.. "

सर्वांकडून होकार मिळाल्यावर भागूबाई हळूहळू शांत झाली. तिला शांत पाहून सर्व आपआपल्या घरी गेले.

आमच्या बौद्धवाड्यात अधूनमधून आंबेडकरी चळवळीचे माणसे येऊन आम्हांला परिवर्तानाच्या गोष्टी सांगत. देव आणि हिंदू धर्मातल्या अंधश्रद्धा सोडून फक्त बुद्धाचे आचरण करायला सांगत. आम्ही मात्र इतर देवाबरोबर बाबासाहेब आणि बुद्धालाही जोडले होते आणि तेही देवाचा अवतारच आहेत असेच मानत होतो. पण सततच्या परिवर्तनाने एक टक्का का होईना पण आमच्या यटाळीत परिवर्तनाचे वारे वाहत होते आणि देवाला बोकड कापणे, दर्शनास जाणे हे थोड्या प्रमाणात का होईना पण बंद होऊ लागले. आमच्या यटाळीतल्या लोकांनी सवण्याच्या महूमायकडेही चार वर्षापासून पाठ फिरवली होती. पण आमची भागूबाई महूमायची कट्टर भक्त, भावकीनी महूमायकडे असा कानाडोळा करणे तिला अजिबात खपले नाही. ती कोणत्या तरी प्रकोपाची वाटच बघत होती आणि नेमकी या वर्षी गारपीठ

झाली आणि भागूबाईला महूमाय अंगात आणून बोलण्याची संधी भेटली. माझ्या अडाणी भावकीला हेच वाटले की, महूमायचाच हा प्रकोप आहे.. महूमाय ही सवन्याच्या माळावर होती. त्या देवीच्या दर्शनाला जास्त करून मातंग आणि बौद्ध समाजच जात असे. दुसरा समाज तिथे ढुंकूनही बगत नसे. महूमायला बोकड्या कोंबड्याचा नवस बोलत असत आणि पूर्ण झाला तर तिथे जाऊन बोकड कोंबडे कापत असत आणि नवस न बोलता दर्शनाला जायचे असेल तर तिला तेलात तळलेल्या पु्ऱ्या नैवेद्य आणि प्रसाद म्हणुन नेत. तिला जायचे म्हणजे सर्व आपापली बैल गाडी घेऊन जात. यावर्षी महूमायला जायचेच हे भावकीतल्या सर्व बायकांनी ठरवले. महूमायला पोर्णिमेच्याच दिवशी जात असत. मला फार उत्सुकता लागली होती महूमायची. जिथे जाणे म्हणजे एखद्या जत्रेला जाण्यासारखे होते. देवीला जाण्याची तयारी आमच्या यटाळीतल्या बायांनी दोन दिवसा पासूनच सुरू केली. आमच्या यटाळीचा या वर्षी नवस नव्हता त्यामुळे सर्वजन तळलेले पदार्थच घेऊन जाणार होते. मला ज्या दिवसाची उत्सुकता लागली होती शेवटी तो दिवस उजाडलाच!

सकाळीच मायने दुकानातून एक किलो शेंगदाण्याचं तेल आणलं होतं. गावात जाऊन सदाच्या घरून दोन आधली ज्वारीचं पीठ देऊन एक आधली गव्हाचं पीठ घेऊन आली. महूमायलं जाण्याची तयारी सकाळपासुनच सुरू झाली होती. माझ्या बापाने कणग्यावरच्या गाठोड्यातल्या घागरमाळा काढून बैलांच्या गळयात घातल्या भिंतीवरचा वंगणाचा डब्बा काढून गाडीच्या चाकाला वंगण लावले गाडीच्या पाळण्यात तीन चार कडब्याच्या पेंड्या टाकून, पाठीमागून दोरीने पाळणा घट्ट बांधून घेतला. आम्ही भावंडं कितीही रडलो तरीही माझी माय केंव्हाच आम्हांला

तळलेल्या पुऱ्या देत नसे. पण देवीसाठी न चुकता तळलेल्या पदार्थाचा नैवेद्य करीत असे.

"झाली का लिंबा तयारी? ? "

सुदाम बापूनी चालता चालता बाहेरून आवाज दिला. तो आवाज ऐकून हातचे काम टाकीत माझा बाप बाहेर येऊन म्हणाला,

"हो काका झाली. आता फक्त बैलचं खांदी घालायचे! "

"घाल फट्कन मंग, मी ज्ञानबाचं आवरलं का ते पाह्येतो "

ते ऐकून माझ्या बाप बाहेरूनच मायला हाक मारीत म्हणाला,

"आटप ये लवकर, निघ बाहीर. समद्याची तयारी झाली. "

"आली आली "

घाई गरबडीत नैवेद्य बांधित मायने आम्हांला बाहेर जाण्यास सांगितले. सर्वांची तयारी झाली होती. बैल आपल्या खांद्यावर धुऱ्याचं जू घेऊन चालायला उत्सुक झाले होते. नथुकाकानी सर्व गाड्यांवर नजर फिरवली आणि म्हणाला,

"आले ना सगळे रे"

ते ऐकून सर्वांनी मान हलवित होकार दिला. ते बघून नथुकाका भागूमायकडे बघत म्हणाला,

"भाभी, निघायचं का आता? "

"हो भावजी, एकदा महूमायचा गजर घ्या आन घाला बईल खांदी. "

सूर्य डोक्यावरून हळूहळू सरकत पश्चिमेकडे कूच करीत होता. महूमायचा गजर करीत आमच्या भावकीच्या पाच बैलगाड्या सवण्याच्या महूमायच्या दिशेने रवाना झाल्या. माझ्या बैल गाडीत आम्ही चार भावंडे, माय बाप आणि सोबत जुन्या लुगड्याच्या पालवात बांधलेली भल्ली मोठी नेवैद्याची शिदोरी होती. सर्वजण बैलांना हाकीत सवण्याचं शिवार जवळ करीत होती. सर्व भावकी अशी सोबत महूमायला जाताना पाहून भागूमाय खूप खुश झाली होती. आमचं शिवार मागे टाकीत आम्ही सवण्याच्या शिवारात शिरलो. जशीजशी गाडी पुढे जात होती तसेतसे घनदाट जंगल माझ्या नजरेस पडत होतं. नुकत्याच अटलेल्या ओढ्याच्या शेजारच्या पांदीतून आमच्या बैलगाड्या चालत होत्या. जमीन ओली असल्यामुळे बैल एकएक पाऊल उचलून सावकाश टाकीत पुढेपुढे जात होते. जशी जशी गाडी पुढे जात होती तसे त्या आटलेल्या ओढ्यात पाणी दिसत होते. आजूबाजूला मोठमोठी अंजन, बाभळी, निलगिरी, वेळूची झाडे नजरेस पडत होती. उंच उंच हिरव्यागार गवतातून जाणारा तो पांदीचा रस्ता आणि चिखलात फसलेला एकएक पाय उचलीत चालणारे आमचे ते बैल. हे बघून सारेच बेचैन झाले.

"महूमाय वेवस्तीत येऊ दे व माय तुह्या दर्शनालं. आमची गाडी फसू देऊ नको या चिखलात. "

पांदीची ती अवस्था बघून माझी माय हे मनातल्या मनात पुटपुटत होती. ओढ्याच्या शेजारून जाणारा पांदीचा रस्ता अचानक त्या ओढ्यात शिरला हे बघून सर्वात पुढे असलेल्या ज्ञानबा काकाने गाडी, बैलाचे कासरे आवरीत अचानक थांबवली. ते बघून सर्वांनीच गाड्या थांबवल्या.

"काय झालं रे ज्ञानबा? ? गाडी काहून थांबवली? ? "

नथु काकाने पाठीमागून आवाज दिला.

"काय न्हाय काका, गाड्या पाण्यात काढाय लागतील. पुढं रस्ता पाण्यातून गेलाय. "

"जाऊदे जाऊदे, गाडरस्ताच हाये ह्यो पाणी जास्त खोल न्हाई "

बरं बरं करत ज्ञानबा काकाने कासरा ढिला केला तसे थांबलेले बैल पुन्हा चालायला लागले.

रान संपून आता महूमायचा डोंगर जवळ येत होता. ते बघून सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला.

"आला वं माय एकदाचा महूमायचा डोंगर"

एका मोठ्या बांधलेल्या ओट्यावर महूमाय स्थित होती.  मी गाडीतून उभं राहून लांबूनच बघत होतो. आमच्या व्यतिरिक्त तिथे दुसरेही लोकं आली होती, कुणी कोंबडी घेऊन तर कुणी बोकड घेऊन. आमच्या गाड्या महूमायच्या जवळ येऊन

थांबतात न थांबतात की महूमाय अचानक भागूबाईच्या अंगात शिरली. भागूबाई पुन्हा दोन्ही हाताचे बोटे एकमेकात घुसवून झुलाय लागली. झुलत झुलत महूमायच्या ओट्यावर जावून बसली. ते बघून माझ्या काक्या आणि मायही महूमायच्या ओट्यावर गेल्या. सर्वजणी तिच्यावरुन लिंबू ऊतवत आणि हळदकुंकू लावून दर्शन घेत. सर्वांचे दर्शन व नैवेद्य दाखवून झाल्यावर भागूबाई शांत झाली. पुऱ्याच्या प्रसादाचा सर्वांनी आस्वाद घेतल्यावर रात्र होण्या आगोदर पुन्हा आम्ही परतीच्या मार्गाला लागलो. तेथून परत जातांना सर्वांच्या मनात एक खुशी होती,
' चला, आपल्या येटाळीवर असलेला महूमायचा प्रकोप आता शांत झाला. '

# 8

आक्टोबर महिना संपत होता. पावसाळयात ओढ्या, नाल्यात साचलेलं पावसाचं पाणी आटत चाललं होतं. गावचा ओढा आटत आटत भवानीच्या डवापर्यंत आला होता. पंधरवाड्यापूर्वी भवानीच्या डवात सडू घातलेल्या अंबाड्या बाहेर काढून माझा बाप ताग काढत होता. काढलेला ओला ताग माझी माय जमिनीवर वाळू घालत होती. मी माझ्या बापाजवळ बसून ताग काढण्याची प्रक्रिया ध्यान लावून बघत होतो. त्या डवाचा सडका वास चौफेर दरवळत होता, जणू काही शेजारी एखादे जनावरच मेले. पण त्याची चिंता आम्हांला नव्हती. कारण आख्या गावच्या आंबाड्या त्या पाण्यात सडू घालत असत. त्याचा वास येणारच. भवानीच्या डवाशेजारी बेसरमीच्या झाडाचे घनदाट साम्राज्य होते. गावातून डवापर्यंत येण्यासाठी त्या झाडामधूनच पाऊलवाट होती. त्यातून कुणी येत असेल तर आगोदरच कळत असे, कारण तेथून येणाऱ्या माणसामुळे ते बेसरमीचे झाडे बुडापासून हलायला लागत. जणू काही त्या बेसरमी नाचायलाच लागल्यात. त्यामुळे माझे लक्ष जास्त त्या झाडाकडेच असे. सूर्य डोक्यावर आला होता. सर्विकडे भयाण शांतता पसरली होती. अधूनमधून पाखराच्या ओरडण्या व्यतिरिक्त तिथे कसलाही आवाज येत नव्हता. माझे लक्ष

बेसरमीकडे गेले तर त्या बेसरमी हालताना दिसल्या. ते बघून मी माझ्या बापाला म्हटले,

"बापू... कोण्ही तरी यायलय आपल्याकडं. "

ते ऐकून माझे मायबापही त्या दिशेने बघायला लागले. कोवळया उंच उंच वाढलेल्या बेसरमी हाताने सारत सारत आमच्या यटाळीतला माझा चुलत काका आमच्याकडं येत होता. ते बघून माझ्या बापाने त्यांना लांबूनच आवाज दिला,

"काय सोपान दा, इकड् कसा काय? ? ? ? "

" तुह्याकडंच आलो लिंबा दा "

सोपान काका आमच्याजवळ आला आणि बसला.

"पहाट पसून  काढायला वाटते ताग. "

"हो सोपान दा, कसाबीक पन्नास साठ वव दोरी पुरता झाला तरी बस्स..... काढ चीलम आला त आता. "

हात धूत माझ्या बापाने सोपान काकाला म्हटले.

तसे सोपान काकाने कमेजात हात घालून मळकट झालेल्या छोट्या बटव्यातून चिलीम काढली, त्यात तंबाखू भरून पेटवली. एक सूरका मारून माझ्या बापाकडे देत म्हणाला,

"लिंबा दा, तूलं माहीत हाये का? संप्पु काका आलाय. मलं वाटते आपल्या यटाळीतल्या भांडणाची खबर लागली वाटते त्याला. "

"काय बोलतू! कव्हा आला? "

" पहाटच्या गाडीनच आलाय, म्हादू काकाच्या घरात हाये. "

" रात्री हाये मिटींग मंग आपल्या यटाळात"

"चाल येतो मी, शीरंगच्या वावरात जावून त्याल पण सांगायचं"

माझ्या बापाच्या हातातली चिलीम घेत सोपान काका निरोप घेत निघून गेला.

कुणी वावरात, कुणी दुसऱ्याच्या वावरात, गावातल्या चारही शिवारात रोजमजूरीचे काम करत असलेल्या माझ्या येटाळीतल्या साऱ्या भावकीला संपू काका आल्याची खबर लागली.

संपू काका म्हणजे माझा चुलत आज्या, भावकीत सर्वात वयस्कर, सर्वांना वडिलाप्रमाणे. आमच्या यटाळात त्याचाच दबदबा असे. यटाळात नेहमी एकोपा असावा, सर्व भावकी गुण्यागोविंदाने नांदावी असे संपू काकाला नेहमी वाटे. संपू काकाचे लग्न झाले तेंव्हापासून तो त्याच्या सासरवाडीतच कायमस्वरूपी रहायला गेला होता. असे असतांनाही त्याचा सारा जीव गावातल्या त्याच्या यटाळातच होता. भावकीतल्या सर्वांना तो आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करी. त्यामुळे भावकीनेही त्याला तितकेच जवळ केले होते. आगोदर आमची भावकी गुण्यागोविंदाने नांदत होती पण

कधी अधूनमधून बायकांमुळे भांडणाची ठिणगी पडतच असे. भावकीत भांडण झाले अन ती खबर जर संपू काकाच्या कानावर पडली तर त्यांची तळपायाची आग मस्तकात जायाची अन हातचे काम टाकून तो गावी यायचा अन भांडण मिटवून परत जायचा. तसं बौद्धवाड्यात वसलेलं आमच्या भावकीचं यटाळ छोटसच होतं. पस्तीस ते चाळीस घरे असणाऱ्या  बौद्धवाड्यात आमच्या यटाळीचे जेमतेम दहा बारा घरे होती. एकाच रक्ताचे हे बारा घरे. एकमेकाच्या शेजारी असल्यामुळे भांड्याला भांड लागणारच. आमचा मूळ पूर्वज ज्यांचे आम्ही अपत्य आहोत तो फार वर्षांपूर्वी या गावात नरसी नामदेव या  गावातून महारकी करण्यासाठी आला होता. एका घराचे दोन, दोनचे चार, चारचे आठ असे वाढत वाढत आमचे यटाळ वाढतच गेले. यटाळीतल्या दोन बायकात भांडण झाली आणि त्यांचे नवरेही एकमेकांवर मारायला सुटले अशी बातमी संपू काकांच्या कानावर आली. तसा तो हातचे सारे काम टाकून भांडण मिटवण्यासाठी आला होता. संपू काका जितका प्रेमळ तितकाच आक्रमक आणि रागीटही होता. संपू काका आज नक्कीच यटाळातल्या सर्वांचीच खरटपट्टी काढणार ही चर्चा साऱ्या यटाळातले लोकं करीत होते.  संध्याकाळ होत होती तसे रानातून सारे घरी परतायला लागले. दिवसभर काबाडकष्ट करून थकून सर्वजण आपापल्या घरात येऊन बसले होते. पोटात लागलेल्या आगीला शांत करण्यासाठी बायका चूल पेटवून जेवन बनवीत होत्या. हे सर्व करतांना प्रत्येक घरात चर्चा मात्र संपू काकाचीच होती. रात्र झाली तसा माझ्या मायने स्वयंपाक घरात रॉकेलच्या तेलाचा दिवा पेटवला अन जेवण्यासाठी आम्हांला आवाज दिला,  तोच बाहेरूनही आवाज आला,

" लिंबा, शिरंगच्या घरी ये लवकर. संपू काकाने सर्वांना बोलवले. "

सुदाम काकाचा आवाज ऐकून माझा बाप सरळ श्रीरंगच्या घराकडे निघाला. त्यांच्या पाठी पाठी मीही गेलो. श्रीरंगच्या घराबाहेर पूर्ण अंगणभर चव्हाळ अंथरलं होतं. यटाळातले माझे चुलते काके, म्हातारे, जवान, मुले सारेच बसले होते. संपू काका, नथु काका, विठ्ठल काका समोर मांडी घालून बसले होते. सर्वजण आल्यावर संपू काकाने एक नजर सर्वत्र फिरवली अन म्हणाला,

" हँ, आले का रे सगळेजन"

म्हादू बापूने उठून सगळयाकडे बघितले अन म्हणाला,

"हो दा, समदे आलेत आता. "

हे ऐकून संपू काकाने बोलायला सुरवात केली,

" आरं, चाललंय काय आपल्या यटाळीत, या ना त्या कारणाहून घडी घडी भांडण, एकमेकाचा राग, कुठं गेला आपल्या यटाळातला एकोपा? समदी बायकाचे बैल झालेत. नथु दा, आरं मी परगावी असतो, पण इथं तू समद्यात मोठा हायस न तू समजावून सांगायचं न याह्यलं. "

"काय सांगू दा आता, आपआपल्या मनानं समदी वागायलीत, कुणाचा विचार नाय घेत काय नाही. मह्या पण आता याह्यच्या मधात पडायचं बंद केलंय दा. तूच सांग आता याह्यलं, तूह तरी आईकतील ही. "

पोट तिडकीने संपू काका अन नथु काका बोलू लागला आणि सारेजन शांत मनाने त्यांचं ऐकू लागली.

यटाळातल्या ज्या दोघांची भांडण झाली होती त्या दोघांनी नथुकाकाने भांडणाचे कारण विचारलं,

"शोभते का रे तुम्हाल भांडण करायलं, जे काय झालं ते सांगा अन एकमेकाची माफी मागून विसरून जा. "

चर्चा झाली, चर्चा रंगली दोघांनी एकमेकाना माफी मागितली. सर्वकाही आलबेल झालं. मिटींग संपली सर्वजण आनंदात आपापल्या घरी गेले. संपूकाकाही दुसऱ्या दिवशी सर्वांचा निरोप घेऊन सासुरवाडीला रवाना झाला. शेवटपर्यंत संपूकाका गावी येऊन यटाळातले भांडण मिटवतच राहिला. संपू काका मेल्यावर यटाळातला भांडण तंटा मिटवण्याचा धुरा नथुकाकावर आला.

# 9

महादेवाच्या मंदिरासमोरचे भागवत संपल्यावर गावाच्या वतीने मोठा भंडारा ठेवण्यात आला होता आणि त्या भंडाऱ्यात जेवायला अख्या गावाला आवतण देण्यात आलं होतं. गावात भंडाऱ्यात जेवायचे आवतण असल्यामुळे आम्ही मुले सकाळपासुनच मांगवाड्यातल्या मरीमायच्या ओट्यावर बसलो होतो. मधेमधे मंदीरासमोरच्या भंडाऱ्यात जाऊन, चाललेला स्वयंपाक बघून जेवायला कायकाय आहे ते घरात सांगत होतो. गावात आज चुल बंद होती त्यामुळे आमच्याही घरात संध्याकाळचा स्वयंपाक बनवला नव्हता.

संध्याकाळचे चार वाजले आणि भोंग्यामधून आवाज़ आला, "सर्व पाव्हने मंडळीला सूचित करण्यात येते की, त्यांनी महादेवाच्या वट्यावर येऊन जेवण्याची कृपा करावी.. "

पाव्हने जेवले, गावकरी जेवले त्यानंतर गावातील बायका पण जेवल्या तरीही बुद्धवाड्याला अन् मांगवाड्याला जेवायला बोलावलं नाही. हे बघून बुद्धवाड्यात कुजबुज चालू झाली. सर्व एकमेकास म्हणत,

"आर काय हे... आजून आपल्यालं आवताण कसं काय नाही आलं "

"हो न हो... पाव्हने जेवले, गावकरी जेवले आता बायका जेऊन गड्याची दूसरी पंगत बसायलं लागली. तरी बी नाय बोलवणी आली. "

नुकतीच बारावीची परीक्षा देऊन आलेल्या संतोषच्या डोक्यात मात्र भलतच काहीतरी शीजत होतं. त्यांनी बुद्धवाड्यातल्या अन् मांगवाड्यातल्या दहा बारा त्याच्या वयाच्याच काही मुलांना बाबासाहेबांच्या पुतळयासमोर गोळा केलं अन् त्यांना म्हणाला,

"अरे अजून किती दिवस कुत्र्यामांजरावानी जीवन जगतां. "

संतोषचे हे बोलणे ऐकून सारे एकमेकाकडे बघत होते. संतोषला काय बोलायचे हे कुणालाच कळले नाही त्यामुळे डोके खाजवत सूध्या त्याला म्हणाला,

"संत्या, तूलं काय बोलायचं ते सरळ बोल. आम्हांला तुही, ही शाळची भाषा कळत न्हाई"

"आपण कोण्या गावचे"

त्यावर सारेजन म्हणाले,

"याच गावचे"

"आपण माणसं हाव का जनावर"

"माणसं.... "

"जर आपण याच गावचे हावो जर आपण माणसं हावो जर आपल्याला भंडाऱ्याला बोलवले तर आपल्याला येगळा न्याय का? ? ? ? ? पाव्हने संबदी जेवली गावातली माणसं संबदी जेवली गावातल्या बाया जेवल्या. आता समद्याचं झाल्यावर आपल्याला बोलावतील. ते बी आपल्याच घरचा ताट तांब्या घेऊन.... कारण त्यांच्या लोकांना आपल्या उष्टी पतरवाळी उचलायच काम नाही पडणार म्हणुन. गड्यांनो ह्यो आपला अपमान आहे. हा जातीभेद आहे. यावर आपण बहिष्कार टाकला पाहीजे. "

हे सगळं सर्वजन शांतपणे ऐकत होते. कोण काय बोलत नव्हते, कारण बापजाद्यापासून असंच चालत आलं होतं, गावातल्या सर्वाचे जेवण झाले की उरसूर जेवन बुद्ध आणि मांग समाजाच्या वाट्याला येत असे.

सर्वांना गप्प बघून संत्या पुन्हा म्हणाला,

"तुम्ही ही गोष्ट आता बुद्धवाड्यात अन् मांगवाड्यात सर्वांना सांगा. अजिबात इथून पुढं कुणी जेवायला गेलं नाही पाहीजे. जा लागा कामालं... "

ही आमच्या गावातली पहीलीच विद्रोहाची ठिणगी. आतपर्यंत कुणीही या गोष्टीबद्दल तोंडातून 'ब्र' सुध्दा काढला नव्हता पण संत्याचे ते प्रबोधनात्मक दोन शब्द ऐकून बाकीच्या मुलांचेही मुर्दाड झालेली डोकी पेटली. साऱ्या पोरांनी आपआपल्या घरात ठणकावून सांगितले,

"आज उपाशी झोपायचे काम पडले तरी चालंल. पण त्या भंडाऱ्यात अजिबात जेवायला जायचं नाही. "

गावात सर्वांची जेवण आटपली, मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बुद्धवाड्यात आणि मांगवाड्यात जेवायाचे आवतन देण्यासाठी एक माणूस पाठवला. माणूस बुद्धवाड्यात आला, घराघरात जाऊन "जेवायला चला" असे आवतण देत होता. पण कुणीच घरातून बाहेर पडत नव्हते. तो आवतण देऊन गेला पण बुद्धवाड्यातून अन् मांगवाड्यातून त्या भंडाऱ्याकडे काळं कुत्र सुध्दा फिरकले नाही. गावातले लोक परेशान झाले. अख्या गावचा स्वयंपाक बनवला त्यामुळं जेवण खूप उरले होते. नेमके झाले काय हे जाणून घेण्यासाठी गावातले दोन प्रतिष्ठित व्यक्ती बुद्धवाड्यात आले.

त्यांनी चार दोन माणसांना विचारले,

"आरं काय झालं? ? ? ? जेवायला का येत नाही तुम्ही? ? चला जेवायला चला..... "

ते ऐकून संत्या त्यांना म्हणाला,

"तात्या.... आम्ही नाय येणार... "

"आर पण का? ? आमच्याकडून काही चुकी झाली का? चला... होत असते कमी जास्त. अरे आपल्या गावातल्या देवाचा प्रसाद आहे त्यो"

"प्रसाद आहे तं सर्वांसाठी समान असायला हवा ना, गावातल्या सर्वांचे जेवण झाल्यावर आम्हांला का दिल्या जातो.... इथून पुढं जर आम्हांला एकाच पंगतीत

बसवत असाल तरच आम्ही येतो. नायतर आम्ही समंदी त्या जेवण्याचा बहिष्कार करतो. "

हे विद्रोही बोल ऐकून तेही पेच्यात पडले. ते दोघे सावरासावर करत त्यांना म्हणाले,

"हे पहा, तुम्हांला जेवायला  यायचं की नाही हा तुमचा प्रश्न आहे. आम्ही आमचं काम केलं. अन् जे गावात पूर्वीपासून चालू आहे त्या पद्धतीनेच आम्ही तुम्हांला आवतण दिले. पुन्हा एकदा तुम्हाला विनंती करतो, जेवायला चला"

असे बोलून ते सरळ महादेवाच्या मंदिरात गेले. बुद्धवाड्यात घडलेला सारा प्रकार त्यांनी सांगितला.

हे सारे ऐकून गावातल्या साऱ्या लोकांना आश्चर्य वाटले. कारण, गावात लग्न असो किंवा भंडारा, बुद्धवाडा अन् मांगवाडा सर्वात शेवटीच जेवत असे. आणि आज अचानक यांना आमच्यासोबत जेवायचे हा हट्ट का? बुद्धाच्या अन् मातंग समाजाच्या या मागणीवर गावातल्या लोकांची मीटिंग झाली. गावातही काही सनकी डोक्याची पोरं होती.. त्यांनी निर्णय घेतला की, उरलेले जेवण गुराढोरांना टाकावे लागले तरी चालेल पण आमच्या सोबत पंगतीत त्यांना बसता येणार नाही. गावात सर्वांचा निर्णय झाला. बुद्धवाड्याच्या अन् मांगवाड्याच्या वाट्याचे अन्न तसेच मंदिरासमोर पडून होते. हे बघून मास्तरीन बाईला फार वाईट वाटले... आमच्या गावच्या बालवाडीला शिकवणारी मास्तरीन बाई. मुलगा समजायला लागला की, त्याला बालवाडीच्या शाळेत टाकतात आणि आईच्या नंतर बालवयात

दुसऱ्या कुणाकडून प्रथम बाळकडू त्या मुलाला भेटतो तो बालवाडीतल्या शिक्षकाकडूनच.... मास्तरीन बाईची जात तशी ब्राह्मण. पण मी जेंव्हा बालवाडीत होतो तेंव्हा अगदी नाकातला शेंबुड काढण्यापासून ते नख, बट्ट्न लावण्यापर्यंत बाई आमची सेवा करी. मग तो कोणत्याही जातीचा मुलगा असो, खरेतर मला सातवीत येईपर्यंत बाईची जातच माहीत नव्हती. पण माझ्या मेंदूला जेंव्हा जास्तच जात कळायला लागली तेंव्हा मी मास्तरीन बाईचीही जात हूडकुन काढली. बाईनी शिकवलेल्या प्रार्थना आणि पसायदान आजही वयाच्या एकतीसव्या वर्षीही मला तोंडपाठ आहेत. बाई आमच्या गावात फार पूर्वीपासून होती. त्यामुळे गावातील सारेच मुले मंग तो पाच वर्षाचा असो की पंचवीस वर्षाचा तिच्याच बालवाडीतून शिकून मोठा झालेला होता. त्यामुळे गावात सारेच मुले तिचे ऐकत. तिला मदत करत...

" जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्णब्रह्म " असे आम्हांला शिकवणाऱ्या बाईला जेंव्हा हे प्रकरण माहीत पडले तेंव्हा ती कुणाचेही न ऐकता पुन्हा बुद्धवाड्यात आली. आम्ही पंधरा बीस लहान मोठी मुले ओट्यावरच होतो. बाई आली आणि आम्हा सर्वांना प्रेमाने समजावत म्हणाली,

"अरे असे करू नका रे, देवाचा प्रसाद आहे तो.. तुम्ही नाही खाल्ला तर वाया जाईल. अशी अन्नाची नासाडी बरी नव्हे... "

त्यावर सुध्या अन् संत्या बाईला म्हणाला,

"बाई, तुम्ही या भानगडीत पडू नका, तुम्ही जा मुकट्यानं..... "

"अरे पण कशाला रागावताय.... देवाला सारी एकच रे. तो नाही करत जातीवाद.. "

बाई बुद्धवाड्यात गेली कळल्यावर गावातला मोत्या तावातावाने बुद्धवाड्यात आला अन् आम्हांला प्रेमाने समजावत असलेल्या मास्तरीन बाईला हटकले,

" बाई... कोण्ही सांगतल तुम्हाला इकडं यायचं. तुम्हाला जेवुन मुकट्यानं घरात बसता येत नाही का? उरलेल्या स्वयंपाकाचं आम्ही बघून घेईन. तुम्ही कशालं हात जोड़ता.. जा मुकट्यानं घरी"

मोत्याचे असे अपशब्द ऐकून संत्या त्याला म्हणाला,

"मोत्या, कळते का तूलं कोणाला बोलायला ते. अरे ती बाई आहे. तिला तु ओरडून बोलतोस का"

त्यावर मोत्या रागात म्हणाला, "तु मुका बस्स, आमच्यात नाक नको घूपसू"

दोघे एकमेकास रागाने बोलताना पाहून बाई मधेच त्यांचे बोलणे तोडून म्हणाली,

"मोती तु गप्प बस, संतोष तु पण गप्प बस... मी तुमच्या मधे नाही पडणार पण एकमेका असे भांडू नका. मोती चल... "

असे बोलून बाई निघून गेली.. बुद्ध आणि मातंग समाज शेवटी जेवलाच नाही. त्यांना भुकेपेक्षा स्वाभिमान मोठा वाटला. तेंव्हा मी चौथीला शिकत होतो. ही माझ्या डोळयासमोरची घटना.. अशा आजूबाजूच्या गावातूनही काही ना काही जातीवादी घटना ऐकायला मिळत. त्यामुळे माझ्यासोबत शिकत असलेल्या मराठा समाजाच्या मुलांना बघून एक वैर भावना मनात निर्माण होत होती. आणि त्या कोवळया वयातच आम्ही महापुरुषाच्या वाटण्याही करून टाकल्या होत्या. शिवाजी महाराज त्यांचे आणि बाबासाहेब आंबेडकर आमचे. ते जमेल तितकी बाबासाहेबांवर टीका करीत आणि आम्ही जमेल तितकी शिवाजी महाराजांवर.. असाच एक किस्सा मी चौथीत असताना घडला, शाळेत माझ्या बाजूला बसणाऱ्या विज्याने माझ्याकडे बघून त्याच्या मराठीतल्या पुस्तकातला बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडला. ते बघून मी माझ्या इतिहासातल्या पुस्तकातला शिवाजी महाराजांचा फोटो फाड़ला. ते बघून त्यांनी माझी गच्ची पकडली आणि म्हणाला,

"फोटो काहून फाड़ला तु आमच्या शिवाजीचा.. "

त्यावर मीही त्याची गच्ची पकडून म्हणालो,

"तुह्या काहून फाड़ला आमच्या बाबासाहेबाचा"

"ये जास्त बोलू नको. नाहीतर कुत्र्यासारखा मार खाशील"

"काहून मारशील... तुह्या बापाचं खातो का? ? ? चाल हेडमास्तरकड तुह नावचं सांगतो"

"चाल, मी भीतो काय तूलं"

असे बोलून दोघेही आम्ही हेडमास्तरच्या कॅबिनमधे गेलो. तेंव्हा हेडमास्तर माझ्याच जातीचे होते. माझ्या जातीचा हेडमास्तर होता त्यामुळे मला वाटले तो फक्त विज्यालाच झोडुन काढील अन् मला शाबासकी देईल. त्यामुळे मीही त्याला घेऊन सरळ हेडमास्तरच्या कॅबिनमधे गेलो आणि त्यांच्या समोर जाऊन म्हणालो,

"सर यानं बाबासाहेबाचा पुस्तकातला फोटो फाड़ला.. "

वीज्याही सरांना म्हणाला,

"सर यानी पण शिवाजी महाराजाचा फोटो फाड़ला"

"नाही सर, अगोदर यानं फाड़ला, म्हणुन मी फाड़ला.. "

"नाही सर, अगोदर यानं फाड़ला.. "

"ये ईज्या, खोटं काहून बोलायलास"

"तूच खोटं बोलायला.... "

आमचे भांडण ऐकून सर म्हणाले,

"जा वर्गात जा... मी येतो तुमच्या वर्गात"

हे ऐकून आम्ही सरळ वर्गात गेलो.

मी मनातल्या मनात खूप खुश होतो. कारण, हेडमास्तर माझ्या जातीचा, तो मला थोडा मारणार.. थोड्या वेळाने गुरुजी भलीमोठी बेसरमीची काडी घेऊन वर्गात आले. सर्वात अगोदर त्यानी मला उठवले. माझे, मी फाड़लेले इतिहासाचे पुस्तक घेऊन समोर बोलवले. पुस्तक बघितले आणि ढोपरावर जी मारण्याची सुरवात केली ती काडी मोडेपर्यंत... वर्गातले सर्वजन हसत होते. गुरुजीचं मारणं झाल्यावर कावऱ्या बावऱ्या नजरेनं मी माझ्या जागेवर बसलो.

माझे झाल्यावर विज्याला धो धो धुतला.. त्यानंतर ते दोन्ही पुस्तके वर्गातल्या मुलांना दाखवत सर म्हणाले,

" हे बघा आपल्या शाळेतले हे नग, स्वतःचेच पुस्तकं फाडून माझ्याजवळ आलेत.

काय तर एकाने शिवाजी महाराजांचा फोटो फाड़ला म्हणुन आणि दुसऱ्याने बाबासाहेबांचा फाड़ला म्हणून,

गाढवांनो.... उठा, उभे रहा दोघेही "

रडत रडत आम्ही दोघेही उभे राहिलो, विज्याकडे बोट करीत सर म्हणाले,

"सांग रे, शिवाजी महाराजाचा राज्याभिषेक कोणत्या गड़ावर झाला? ? "

विज्या गप्प घाली मान घालून...

"बरं सांग, शिवाजी महराजांचा गुरु कोण"

विज्या गप्प.. हूँ नाही का चूँ नाही.

नंतर सरांनी मोर्च्या माझ्याकडे वळवला,

" तु सांग, बाबासाहेबांचे मूळ गाव कोणते? "

मीही गप्प

"बाबासाहेबांचे शिक्षण किती? ? ? ? ? "

मी गप्प....

हे बघून सर पुन्हा आमच्याकडे आले आणि मारायला लागले....

"नालायकांनो, अभ्यासाच्या नावाने बोंबाबोंब अन् महापुरुषांचे फोटो फाड़ता काय रे.. गाढवांनो... अरे अगोदर त्यांचे कार्य जाणून घ्या.. नालायक कुठले.."

सरांचा मार खाल्ल्यावर मला कळून चुकले की, मी खूप मोठी घोडचूक केली.

त्यानंतर मी मात्र इतिहासातल्या पुस्तकातले शिवाजी महाराजाबद्दलचे पान ना पान वाचून काढले आणि शिवाजी महराजांनी बाल वयातच माझ्या काळजात घर केले. विज्याची मात्र अधून मधून बाबासाहेबांवर टीका चालूच होती. मी मात्र त्यावर दुर्लक्ष केले....

गावकुसावर वसलेल्या आमच्या यटाळीत आता हळूहळू बदल होत होता. नवस करणे, अंगात येणे ह्यासारख्या गोष्टी जवळपास बंदच झाल्या होत्या. आता खरे,

माझे यटाळ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बौद्ध धम्माच्या मार्गाने चालताना दिसत होते. दर रविवारी थोडे फार का होईना पण, आता विहारात यटाळीतील माणसं जमत होती बाबासाहेबांच्या विचारांची देवान घेवाण होत होती. नवीन पिढी बाबासाहेबांनी सांगितलेल्या गोष्टीचे आचरण करीत. प्रत्येक पौर्णिमेला आता बौध्दवाड्यात बाबासाहेबांच्या गाण्याचा भजन कार्यक्रमही होताना दिसत होते. पोटापाण्यासाठी यटाळीतल्या साऱ्या घरातले नवयुवक शहरात गेले होते पण आवर्जून चौदा एप्रिलला येऊन सर्व बौद्धवाडा जयंती आनंदात करीत होता. जुन्या माणसाच्या हातातला कारभार आता नव्या पिढीने आपल्या हातात घेतला होता. आज आमच्या यटाळात ना कुणाच्या अंगात येत ना कोणता देव कोपत ना भूत येत. आता सर्वजण शूद्ध आणि बुद्ध झाले. हल्लीचीच एक गोष्ट आहे, मी काही कामानिमित्त गावी गेलो होतो. तेंव्हा माझ्या एका लहानपणच्या मित्राला सहजच म्हणालो,

"काय मित्रा, आज मंगळवार! आई मायला नाही गेला कां गोड भात घालायला? "

तेंव्हा तो मला हसत बाबासाहेबांच्या पुतळ्याकडे बोट करीत म्हणाला,

"मित्रा, आता हाच आपली आई आणि बाप"

मीही त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणालो,

"होय मित्रा, फक्त त्याला ओळखायला थोडा उशीर लागलाय आपल्या समजाला"

........................................................................

भाग पहिला समाप्त

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद

यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, अनिल वाकणकर यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, संजय बनसोडे, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान